ाईलीला

ुलै १९८२

गुरु पौर्णिमा विशेषांक

किंमत एक रुपया

श्री साईनाथ वाचनाल

श्री साईबाबा संस्थान, शि



जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :
**श्री.क.हि.काकरे**
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :
**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )

## श्रीसाई वाक्सुधा

वर्ष ६२ वे )    किंमत १ रुपया    ( अंक ४

जुलै १९८३

गुरु पौर्णिमा अमृतमहोत्सव विशेषांक

दूरध्वनी ८८२२५६१

: कार्यालय :
" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



# श्रीसाई वाक्सुधा

परमदुस्तर भवसागर ।
उसळती मोहाच्या लाटा अनिवार ।
आदळती अविचार–तटावर ।
पाडिती तरुवर धैर्याचे ॥३२॥

वाजतो अहंकाराचा वारा ।
तेणे हा डहुळे सागर सारा ।
क्रोध द्वेषादि महामगरां ।
मिळे जै थारा निर्भयपणे ॥३३॥

'मी माझे' हा मगर ।
वासना विकल्प भंवरे अपार ।
निंदा–असूयादि जेथे तिरस्कार ।
असंख्य जलचर तळपती ॥३४॥

ऐसा जरी हा सागर भयंकर ।
अगस्तिरूपे प्राशी गुरुवर ।
तयांचे जे चरण रज किंकर ।
तयां न लवमात्र भय त्यांचे ॥३५॥

म्हणोनि साई समर्थ सद्गुरु ।
होऊनिया भवाब्धिचे तारू ।
आम्ही जे केवळ कासधरू ।
त्या सर्वांस उतरू पैलपार ॥३६॥

–श्रीसाई सच्चरित अध्याय ५२ वा

# सुवचन

## गुरु

"ग"कार म्हणजे सिद्धजाण ।
रेफः पापस्य दाहकः ॥

'उ' कार विष्णू अव्यक्त ।
ब्रम्हरुद्र गुरु निश्चितः॥

त्रितयात्मक श्रीगुरु सत्य ।
म्हणोनि सांगे कालेसी ॥

गुरु हा सिद्ध असतो हे 'ग' या अक्षराने सूचित केले असून, शिष्यांच्या पापांचे दहन करण्याचे अद्भूत सामर्थ्य गुरुच्या ठिकाणी असते असे 'र' या अक्षराने सूचित केले आहे. विष्णू–ब्रम्हदेव व रुद्र यांच्या रूपाने अव्यक्त ब्रम्ह साकार झालेले दिसते. या तिघांचेही सामर्थ्य गुरुमध्ये सामावलेले असते. असे 'उ' कार या तिसऱ्या अक्षराने सूचित केलेले आहे.

# अनुक्रमणिका जुलै १९८३


१) संपादकीय — कृष्ण, बलराम, सांदिपनी
२) महानसंत झोलेबाबा — श्री. दिलीप लांडे
३) परमरहस्यातील मन्मथ स्वामींची गुरुभक्ति —
४) प्रतिकर्ण — श्री. प. वा. भुतकर
५) सद्‌गुरु श्री ताजुद्दीन बाबा — सौ. वसुंधरा देशकर
६) गुरुपौर्णिमा — श्री. साईनंद
७) गुरुपौर्णिमा प्रसाद याचना — श्री. वसंत प्रधान
८) श्री साई सद्‌गुरु महिमा — सौ. उषाताई अधिकारी
९) जैसे मूळा सिंचले — प्रा. र. श्री. पुजारी
१०) सद्‌गुरु महिमा अगाधची — श्री. चिंतामण शिंत्रे
११) साई दरबारातील मानकरी — श्री. माधव गोरे
१२) गुरुपौर्णिमा आणि श्रीसत्यनारायण पूजा — श्री. तुकाराम परब
१३) श्री काकासाहेब दिक्षित — श्री. सदानंद चेंदवणकर
१४) श्रीसाई — सादिक अली गिरकर
१५) नांदा सौख्यभरे — —
१६) जय साई सदगुरु — श्रीनाथ सोनटक्के
१७) साई माझा साईनाथ — श्री. शाम तेंडोलकर
१८) प्रणाम अमुचा बाबांना — शीला नाडकर्णी
१९) पुनर्जीवन — नीला कीर्तने
२०) जरी हे शरीर... — सौ. सुशिला शिंदे
२१) गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने — श्री. माधव भागवत
२२) गुरुपौर्णिमा — श्री. दा. र. दळवी
२३) साई नाव तुझे क्षितीजापलिकडे — श्री. स्वामी संजयानंद
२४) साई असे कैवारी — श्री. जयवंत कुलकर्णी
२५) साई चरणी सारे लागारे — सौ. आसावरी वायकूळ
२६) करुणानिधि राजा साई — श्री. शांताराम नांदगावकर
२७) साईमय जीवन व्हावे — डॉ. इंदूताई नाईक
२८) धन्य आम्ही साईदास — श्री. दत्ता कदम
२९) श्री साई प्रार्थना — डॉ. सौ. सुमति खानविलकर
३०) गुरुपौर्णिमा उत्सव — सौ. वसुंधरा चौरे
३१) शिरडी वृत्त — मे १९८३

# कृष्ण, बलराम आणि सांदिपनी

स. न. वि. वि.

श्रीसाईलीला मासिकाचा हा गुरुपौर्णिमा विशेषांक गुरुपौर्णिमा उर्फ व्यास-




पौर्णिमेच्या सुमारे तीन आठवडे अगोदर श्रीसाईभक्त वाचकांच्या हाती देण्यात अतिशय आनंद होत आहे. भगवान श्री साईबाबांनी १९०८ साली श्री गुरु पौर्णिमेचा उत्सव आपल्या शिरडीत सार्वजनिक स्वरूपात पहिल्यांदा सुरु केला, अशी माहिती मिळते. तेव्हांपासून तो आजतागायत अखंडपणे शिरडीत भक्तांच्या हजेरीत मोठया थाटाने तो साजरा होत आलेला आहे. या उत्सवाला यंदा ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. श्री बाबांनी आपल्या हयातीत सूरू केलेल्या या उत्सवाच्या अमृत महोत्सवा निमित्य हा खास अंक प्रकाशित करीत आहोत. यात प्रामुख्याने गुरुशिष्य संप्रदाया संबंधीचेच लेख—कविता यांचा समावेश केलेला असून अंकातील मजकूराने वाचकांना जास्तीत जास्त समाधान देण्याचा यत्न केलेला आहे.

आमच्या भारतात प्राचीन काळापासून उच्च कोटीतील गुरुशिष्य परंपरा चालू आहे. जगातील अन्य धर्मातील गुरुशिष्य परंपरेपेक्षा आपली ही भारतीय गुरुशिष्य परंपरा अनेक दृष्टीने अधिक वैशिष्ठ्यपूर्ण आहे. आपल्याकडील गुरु-शिष्य संबंधात सर्वोच्च असा महान आदर्श आहे. सद्गुरुच्या ठिकाणी आपण परमात्माच पहात असतो. सद्गुरु व परमात्मा एकच अशी आपली भावना असते, एवढेच नव्हे तर शिष्य हाही परमात्म्याचेच रूप आहे असे सद्गुरुही मानीत असतात. गुरु आणि शिष्य ही एकाच चैतन्याची दृश्यमान असलेली भिन्न रूपे आहेत. वास्तविक दोघेही अंती एकच आहेत. आज ना उद्या शिष्याचे दृश्यमान भिन्नरूप लुप्त होऊन त्याचे सद्गुरुच्या ठिकाणी मीलन होणार आहे. अशा प्रकारची गुरुशिष्य संबंधामध्ये आपण एकात्मता पहात असतो. या संबंधात श्रीसाईबाबांनी एकदा श्री. नानासाहेब चांदोरकरांना सांगितले होते, "सद्भक्त जो आहे तो गुरु म्हणजे वासुदेव परमात्माच आहे. असे मानतो व गुरुही अशा शिष्यास वासुदेव परमात्माच मानीत असतो."

प्राचीनकाळी गुरु आपल्या आश्रमात शिष्यांना तयार करीत असत. त्या प्रकारच्या शिक्षणाचे उत्तम उदाहरण म्हणजे बलराम व श्रीकृष्ण या दोघा बंधूंना मिळालेले शिक्षण. एका जमातीच्या मातब्बर नेत्याची जरी ही मुले होती तरी त्यांना गुरुकडेच सोपविण्यात आलेले होते; व त्याने त्यांना अत्यंत आदरणीय व्यक्ती म्हणून घडविले. आपले गुरु सांदिपनी यांच्याच घरी ते दोघे राहिले. त्यांच्याच घरी राहून आणि त्यांची सेवा करून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. गुरुचे जेवण संपल्यावरच ते आपले जेवण घेत, व गुरुचा प्रसाद म्हणून ते खात असत. गुरुचे कपडे त्यांनी धुतले, वाळविले आणि त्या आदरयुक्त सेवेच्या मार्गाने ते बऱ्याच गोष्टी शिकले. सांदिपनींनी त्यांना भौतिक नैतिक आणि आध्यात्मिक विषयात पारंगत केले. त्यावेळी फळे, प्रयोगशाळा आणि वाचनालये नव्हती. प्रेमळ संवादानी आणि प्रश्नोत्तर पद्धतीने गुरुनी त्यांना कौशल्याने आणि उपयुक्त ज्ञान दिले. त्यावेळी कागद आणि छापखाने नव्हते. श्रवण, पठण, स्मरण शंका निरसन, स्पष्टीकरण यांच्या सहाय्याने शिक्षण दिले जात असे. शिष्यामध्ये यावेळी मनाची एकाग्रता असे आणि सर्व लक्ष केंद्रित करुन ते विषय आत्मसात करीत असत. सांदिपनी सारख्या सत्गुरुना कृष्ण व रामासारखे सत्शिष्य लाभले हे एकमेकांचे भाग्य होय. सद्गुरु जे सांगतील त्याप्रमाणे सत्शिष्याने ऐकलेच पाहिजे तरच तो गुरु–शिष्य भाव. या बाबत श्री समर्थांनीं म्हटले आहे – सद्गुरु वचनी विश्वासपूर्ण । अनन्य भावे शरण । त्या नाव सच्छिष्य ।।

श्री समर्थांनी कल्याण शिष्यास कड्यावरून उडी मारण्यास सांगितले. त्यावेळी सद्गुरुंच्या सामर्थ्यावर पूर्ण विश्वास ठेऊन कल्याणांनी क्षणाचाही विलंब न लावता कड्यावरून स्वतःचे शरीर खाली झोकून दिले आणि अगदी याचवेळी ते खरोखर अध्यात्म्याच्या उच्च शिखरावर जाऊन पोहोचले.

नवनाथातील एक कथा तर सर्वांच्याच परिचयाची आहे. सद्गुरुना विडा आणून देण्यासाठी सत्शिष्य गोरक्षनाथांनी स्वतःचा डोळा काढून देण्यास मागे पुढे पाहिले नाहीं. गुरुसुद्धा आपल्या शिष्यावर फार मोठे उपकार करीत असल्याचे अनेक दाखले सापडतात. श्री बीडकर महाराज, श्री उपळेकर महाराज, श्री संत साईबाबा इत्यादींनी आपल्या अनेक शिष्यांची दुखणी स्वतःकडे घेतल्याची उदाहरणे त्यांच्या चरित्रात वाचावयास मिळतात. आपले भोग सद्गुरुंना भोगावयास लावणे कितपत योग्य ठरेल याचा सत् शिष्याने नेहमीच विचार करावयास पाहिजे.

साईभक्तांनो, आपले सर्वांचे सद्गुरु आहेत संत चूडामणि भगवान साईबाबा. तुम्ही रोज त्यांची प्रार्थना करता, त्यांना वंदन करता, त्यांची पूजा अर्चा षोडषोपचारे विधियुक्त पण करता, त्यांच्या दर्शनाला त्यांच्या पावनभूमीत शिर्डीत पण जाता त्यांचे डोळे भरून दर्शन पण घेता पण त्यांनी जो गुरुमंत्र म्हणून अधिकारवाणीने दिला आहे त्याचे मनन, आकलन, चिंतन करून तो प्रत्यक्षात आपल्या जीवनाच्या अंमलबजावणीत आणण्याचा प्रयत्न करा. त्यांचा मंत्र म्हणजे श्रद्धा आणि सबुरी. कोणतेही कार्य करताना त्यावर श्रद्धा ठेवा, निष्ठा बाळगा, तसेच कोणतेही कार्य करताना कोणत्याही प्रकारची घाई गर्दी करू नका. संथपणाने, शांतपणाने, विचारपूर्वक कोणतेही कार्य करा. सर्वांशी शांतपणाने वागा म्हणजेच श्रीबाबांना सर्वतोपरीने समाधान लाभेल. बाबांचा हात हेच सांगतो आहे. त्यांची कृपादृष्टी तुमच्यावर हवी असेल तर या दोन गोष्टींचे मनापासून या गुरुपौर्णिमेच्या श्रीबाबांनी आपल्या हयातीत सुरू केलेल्या उत्सवाच्या शुभमुहुर्तावर सुरवात करून पालन करा. हाच बाबांच्या गुरुपौर्णिमा उत्सवाचा शुभ संदेश होय. ★

## तह हयात वर्गणीदारांची योजना

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे मुखपत्र असलेल्या श्रीसाईलीला या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या मासिकाची मराठी किंवा इंग्रजी – वार्षिक वर्गणी अवघी १० रु. आहे. ही वर्गणी इतकी अत्यल्प आहे की जगात या मासिका इतके स्वस्त मासिक अन्य कोणतेही नाहीं.

वर्गणीदार दरवर्षी वर्गणी भरतात खरे पण ते कित्येकदा विसरतात कित्येकदा काही अडी अडचणीमुळे वर्गणी भरण्याचे राहून जाते यासाठी नवी योजना १–१–१९८३ पासून अंमलात आली आहे ती अशी की – आपण अवघे ३०० रु. भरलेत की हयातभर तुम्हास ट. हांशीला सकट श्रीसाईलीला अगदी घरपोच येईल. ही सवलत योजना फक्त भारतापुरतीच आहे.

### वर्गणी पाठविण्याचा पूर्ण पत्ता

संपादक श्रीसाईलीला, साईनिकेतन, ८०४ बी डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४.

वर्गणी पाठविताना आपणास अंक मराठी की इंग्रजी हवा ते स्पष्ट लिहा व कदाचित आपल्या पत्त्यात बदल केलात तर वेळोवेळी बदल पत्ता अवश्य कळवा.

# महान संत सद्गुरु झोलेबाबा

–श्री. दिलीप शंकरराव लांडे
मु. पो. तऱ्हाळा, ता. मंगरूळपीर (नाथ)
जि. अकोला, (४४४४०२)

विदर्भात अनेक संत होऊन गेलेत त्याच संतमालेतील एक संतरत्न म्हणजे "परमहंस श्री झोलेबाबा" हे होत.

साईभक्त झोलेनाथ महाराज हे संतरत्न अकोला जिल्ह्यातील मंगरूळनाथ तालुक्यात "चिखली" या ग्रामी "गावंडे" घराण्यात जन्माला आले. वडिलांचे नाव श्री. गणपतराव व आईचे नाव जानकाबाई. गणपतराव व्यवसायाने 'कुंभार' होते. आई–वडिल सात्विक प्रवृत्तिचे व ईश्वरभक्त होते. महाराजांचे बालपण आनंदात पार पडले महाराजांचे शिक्षण फक्त तिसऱ्या वर्गापर्यंतच झाले होते कारण चिखली म्हणजे एक लहानसे खेडेगाव त्यामुळे शिक्षणाची काही खास सोय होऊ शकली नाहीं. महाराजांची ओढ बालपणापासून 'ईश्वराकडे' होती. ते नेहमी आपल्या कामातच मग्न असत.

त्या वेळी लहानपणीच लग्न करण्याची प्रथा असल्या कारणाने महाराजांचाही विवाह लहानपणीच झाला. होता. महाराजांच्या पत्नी "भीमाबाई" चिखली जवळ असलेल्या 'शेलूबाजार' ह्या गावच्या होत्या. ज्यावेळी संसारात पदार्पण करण्याची वेळ आली. त्यावेळी महाराजांनी आपल्या सासरेबुवांना विचारले "मी समजा संसार त्याग केला तर तुम्हांला काही वाईट तर नाहीं ना वाटणार?" सासऱ्याला ते बोल गमतीचे वाटले त्यांनीही गंमत समजून उत्तर दिले "काहीही वाईट वाटणार नाहीं." त्या दिवसा पासून खरोखरच त्यांनी संसार त्याग केला. त्या दिवसापासून त्यांची दिनचर्या एकदमच बदलली. एकांतात ईश्वर–स्मरण करीत बसावे. वेड्यासारखे इकडे तिकडे फिरावे. एखाद्या वेळी "मातकाम" करावे. ते इतके सुंदर मातकाम करीत की, पहाणारा एकदम दंग होऊन जाई. ते ईश्वर सान्निध्यात इतके गुंग झाले की त्यांना कोणत्याच गोष्टीचे भान रहात नसे. खाण्याचे झालेच तर अर्धी-चतकोर 'भाकर' कुणाकडेही मागून खावी. दिली तरी ठीक नाही दिली तरी ठीक. लोक त्यांना वेडापीसा

म्हणत. वयाच्या ३० व्या वर्षापर्यंत ते असेच भटकत राहिले. परंतु पुढे मात्र त्यांचे अनेक साक्षात्कार लोकांना घडू लागले.

तेथील जमीनदार श्री. नारायज राव चौधरी यांना महाराजांचा पहिला साक्षात्कार घडला. नारायणराव म्हणजे स्वत: मेहनती स्वत:च शेतीची कामे करावी. ते दररोज प्रमाणे सकाळी ५ वाजता उठून बैलांसाठी "कुटार" आणण्यासाठी कुटाराच्या खोलीत जाण्यासाठी निघाले तेव्हां अचानक महाराज तिथे आले व म्हणाले "तू कुटार आण्याले जाऊ नको, जरासाक थांबून जाय" चौधरींना आश्चर्य वाटले की हा झोल्या आपणास का जाऊ देत नाहीं ते थोडा-वेळ थांबले. थोडया वेळातच त्या कुटारातून दोन भले मोठे साप निघून दुसरीकडे निघून गेले. तेव्हां चौधरींना समजले की, झोल्याने आपणास का जाऊ दिले. नाहीं, आपले प्राण वाचवले तेव्हांपासून तो बाबांना भजू लागले.

तसाच दुसरा चमत्कार तेथून जवळ असलेल्या "आजगाव" येथील "श्री बळीराम ठाकरे" याना घडला. श्री बळीरामजी हे त्यांना मिळालेल्या 'इस्टेटीत' गुंग झाले. त्यांचे ईश्वरभक्तीकडे दुर्लक्ष झाले. त्यांच्या स्वप्नात जाऊन महाराजांनी त्यांना दृष्टांत दिला व ईश्वरभक्तीकडे होत असलेल्या दुर्लक्षाकडे त्यांचे लक्ष वेधले. व चिखलीला बोलावून घेतले. चिखलीला आल्या नंतर त्यांना उपदेश केला. त्या दिवसापासून ते बाबांचे भक्त झाले. बाबांनी त्यांना अन्नदान करण्यास सांगितले. त्यांनी बाबांच्या सांगण्यावरून दरवर्षी भंडारा करण्याचे कबूल केले.

नवीन दर्शनाला येणाऱ्याला वाटायचे की हा एक वेडापिसा मनुष्य आहे. कारण बाबांची बडबड नेहमी चालू असे. बाबांची बडबड व्यर्थ नसे कारण त्या बडबडीतून ते दर्शनाला येणाऱ्या भक्तांना उपदेश करीत. असाच एक प्रसंग गाडगेमहाराजांचे काही शिष्य चिखलीत एका गृहस्थाकडे आले ते परततांना 'बाबा' एका झाडाखाली बसलेले त्यांना दिसले. परंतु त्यांनी कोणी वेडापिसा असेल म्हणून दुर्लक्ष केले. ते जेव्हां गाडीत बसले. त्यावेळी मात्र गाडी अजिबात चालू होईना. गाडी एकदम व्यवस्थित, गाडीत काहीच बिघाड नाहीं. तरी गाडी चालू होईना. त्यावेळी एक सद्गृहस्थ म्हणाले तुम्ही झोलेबाबांचे दर्शन घेऊन या गाडी चालू होईल. त्यावेळी महाराज जवळच बसून होते. भक्तांनी दर्शन घेतले व चुकीबद्दल क्षमा मागितली. महाराजांनी एक दगड घेतला व गाडीला

मारला व म्हणाले "हकाल तेरी बांडी घोडी" असे म्हणताच गाडी चालू झाली व गाडगे महाराजांचे शिष्य नमस्कार करून निघून गेले.

महाराजांचे असे हजारो चमत्कार सांगता येतील. महाराजांच्या कृपेने अनेकांची दुःखे दूर झाली. अनेकांना पुत्रप्राप्ती झाली. अनेकांचे कल्याण झाले.

महाराजांची किर्ती दिवसेंदिवस वाढू लागली. भक्तलोकांनी यात्रा उत्सव सुरू केला. यात्रेचा दिवस ठरवला. "पौष शुद्ध पौर्णिमा" यात्रेत हजारोंच्या संख्येने भक्त लोक सामील होतात. यात्रेत महाप्रसाद वाटला जातो. तो नेत्र-दिपक सोहळा पाहून मन शांत होते.

महाराज जरी वरून कठोर वाटत असले तरी, अंतःकरणातून भक्तांचे कल्याण कसे होईल याचाच ते नेहमी विचार करीत. महाराज जरी थकले होते, तरी भक्तांची विचारपूस करीत. ते आजारी पडले तेव्हां भक्तांनी नामांकित डॉक्टर आणले परंतु बाबांनी सांगितले की "आता काहीही फायदा नाही." शेवटी महाराजांनी परमेश्वराचे नामस्मरण करीत दि. ६–११–७७ ला आपली इहलोकीची यात्रा संपविली.

बाबांचे भव्य समाधी मंदिर भक्तांनी चिखलीत बांधले. ते भक्कम बांधकाम पाहून नेत्राचे पारणे फिटते. महाराजांचे भक्त मंडळीतील श्री आत्मारामजी वाघ, श्री. महादेवराव वाघ, महाराजांचे बरेच अनुभव सांगतात. झोलेबाबा संस्थानचा कारभार श्री. नामदेवराव सुर्वे उपाख्य बंडूजी पाटील तसेच श्री. जनार्दनपुत्र चौधरी यांच्या तसेच अन्य विश्वस्तांच्या देखरेखीखाली यशस्वी रितीने चालू आहे व संस्थानची दिवसे दिवस प्रगती होत आहे. महाराजांच्या कृपाछत्राखाली संस्थानने अनेक कार्यक्रम आखले आहेत. महाराजांचे चमत्कार अजूनही होतात.

"झोले महाराजांच्या चरणी कोटी–कोटी प्रणाम."

"जयजय स्वामी झोलेराज तारी तू मज सद्गुरुराज"

परमरहस्यातील

# मन्मथस्वामींची गुरुभक्ती !

कार्तिक शुद्ध १५ ला बीड जिल्ह्यांतील सुप्रसिद्ध कपिलाधार क्षेत्रात श्री मन्मथ-स्वामींची चार दिवस दरसालाप्रमाणे महायात्रा भरते. बालाघाटमधील नयनमनोहर सृष्टी सौन्दर्याच्या व दोन लहान नद्यांच्या संगमाने तयार झालेल्या नैसर्गिक धब-धब्यांसमोर खोल दरीत श्री मन्मथस्वामींनी ३६२ वर्षापूर्वी जिवंत समाधी घेतली आहे. ती एक जागृत समाधी आहे. शिवयोगी मन्मथ स्वामींच्या समाधी दर्शनास मराठवाड्यातील हजारो स्त्री पुरुष यात्रेत मोठ्या भक्तिभावाने जमतात. कपिलधार देवस्थान कमिटी यात्रेच्या व्यवस्थेसाठी खूप परिश्रम घेत असतात. कपीलमुनींच्या व मन्मथस्वामींच्या या तपोभूमीत हजारो लोक जमून, भजन, कीर्तन, प्रवचनांचा व प्रसादाचा लाभ घेतात.

श्री मन्मथ स्वामी इ. स. १५६० ते १६१३ या काळात होऊन गेले. मराठीचे आद्य कवि श्री मुकुंदराज व संत तुकाराम यांच्या समकालीन श्री मन्मथस्वामी असावेत. मराठी वाङ्मयांतील श्री मन्मथस्वामी हे आद्य शाहीरही होत. त्यांनी उत्तमोत्तम १०-१२ अध्यात्मिक ग्रंथ लिहिलेले असून श्रींच्या लावण्या, पदे व शेकडो अभंग सु-प्रसिद्ध आहेत. त्यांनी लिहिलेला 'परम रहस्य ग्रंथ' तर भगवद्गीता व सिद्धांतशिखा-मणिप्रमाणे वीरशैवांना अत्यंत प्रिय आहे. त्या परमरहस्यांतील "गुरुभक्ति विषयक" भाग अतिशय उद्बोधक असल्याने येथे देत आहोत.

खरं म्हणजे मन्मथ स्वामी शिवभक्त होते की नाही याबद्दल शंका वाटावी अशी त्यांची गुरुभक्ति पराकोटीची आहे. कालक्रमानुसार जर पाहिले तर महाराष्ट्रात ज्ञानेश्वरानंतर गुरुभक्तीला मन्मथस्वामी येवढं महत्व देणारा दुसरा संत निर्माण झालाच नाही असे म्हटले तरी ती अतिशयोक्ति ठरणार नाही. मन्मथ स्वामींची गुरुभक्ति अनन्यसाधारण असून स्वाभाविक आहे. मुलाबद्दलचे वात्सल्य आईच्या मनात किंवा पिलाविषयीचे वात्सल्य पक्षिणीच्या मनांत जसं स्वाभा-

विक असते त्याचप्रमाणे त्यांची गुरुभक्तिही स्वाभाविकच आहे असे अनेक त्यांच्या ग्रंथावरून व परमरहस्य या ग्रंथाच्या अनेक अध्यायातून ते स्पष्ट होत आहे. इतकेच नाही तर परमरहस्य विवेचनाच्या ओघात 'गुरू' हा शब्द आला की लगेच चालू विषयाला कलाटणी बसून त्यांची वाणी गुरूचे महत्व, गुरूचे प्रकार, गुरू व सद्‌गुरू यातील भेद वर्णनांत रंगून जाते. व या गुरूभक्तिपर वर्णनात त्यांची गुरुभक्ति आधणावर ठेवलेल्या दुधासारखी उतू जायला लागते. विषयाच्या विवेचनाला बसलेली ही कलाटणी जाणीवपूर्वक नसते ती नकळतच मिळालेली असते म्हणूनच ती स्वाभाविक वाटते.

गुरू व सद्‌गुरू यातील भेद मन्मथस्वामींनी जसा स्पष्ट केला आहे तसा इतर कोणत्याही संतानी केला नसावा असे वाटते. कांही अभंगातून व कांही ग्रंथातून त्यांनी 'गुरू' हा शब्द जरी वापरलेला असला तरी सद्‌गुरू हाच अर्थ त्याना अभिप्रेत आहे. पण परमरहस्यात मात्र त्यांनी गुरू व सद्‌गुरू या दोन शब्दांची तात्विक चर्चा त्यांनी केलेली आहे. 'जे शिष्याला स्वयं परब्रम्ह करतात ते सद्‌गुरू व जे नुसते पोट भरावयाचे ज्ञान देतात त्याना गुरू म्हणावे कां?' असा त्यांचा संकेत आहे. म्हणजे बुद्धिसंबंधीत असे ज्ञान देणाऱ्याला ते गुरू म्हणतात व बुद्धि बरोबरच मनाशी संबंध आणून ज्यानी 'देह कावलाचे कैवल्य केले' अशा गुरूस ते सद्‌गुरू म्हणतात.

असा हा सद्‌गुरू उत्तम शेतकऱ्यासारखा असतो असे ते म्हणतात. ज्याप्रमाणे एखादा जातीवंत शेतकरी जंगलातील अनेक दुष्ट श्वापदे मारून, तेथील काटेरी व इतर मोठमोठी झाडे तोडून नांगरणी व कुळवाडी करून अशा सुयोग्य तयार झालेल्या जमीनीत मग सुबीजाची पेरणी करतो त्याचप्रमाणे आशा, मनिषा, तृष्णाच्या पालव्या छेदून सद्‌गुरू शिष्याच्या देहाचे परब्रम्ह करून सोडतो असे मोठे रसाळ वर्णन त्यांनी परमरहस्यात केलेले आहे.

इतर ज्ञान देणाऱ्याला सद्‌गुरू न म्हणता गुरू म्हणून स्वामींनी त्यांचा मान राखलेला असला तरी जीवाला अयोग्य ज्ञान देऊन शिष्याला भोंदून खाणाऱ्या व स्वतःबरोबर शिष्याच्या आयुष्याचेही मातेरे करणाऱ्या दांभिकाचा मात्र त्यांनी खरपूस समाचार घेतला आहे. मग तो जंगम जरी असला तरी त्यांची भीड त्यांनी धरलेली नाही.

आणि हा सद्‌गुरूत्वाचा मान नुसत्या ज्ञानाने न मिळता ज्ञान आणि क्रिया (आचार) या दोहोंतून मिळतो असा त्यांचा सिद्धांत आहे. ज्ञान आणि क्रिया यानी

युक्त असणाऱ्यानाच ते वीरशैव म्हणतात. "जरी ज्ञानी पूर्ण झाला। तरी स्वधर्माचारे मान त्याला ॥" असे ते परमरहस्यातून सांगतात. अभंगातूनही हाच आशय ते मांडतात पण परखडपणे मांडतात. "जळो त्यांचें ज्ञान। जळो त्यांची भक्ति ॥" असे ते म्हणून क्रिया रहित (आचार रहित) ज्ञानाचा व भक्तिचा निषेधच ते करतात.

गुरूच्या उपदेशाचे प्रकार सांगताना त्यांनी घरोघर गुरू आहेत. इतकी विपुलता दाखवून दिली आहे, व अशा घरोघरी सापडणाऱ्या गुरूचा उपदेश कसा असतो हे परमरहस्याच्या शेवटच्या अध्यायातून त्यांनी सांगितलेले आहे. ते म्हणतात "हे गुरू नाना मते साधिती। एकते तीर्थाटना धाडिती। एक ते पाषाण पुजविती। नाना दैवते ॥ एक ते तपा धाडिती। एक ते करकमळी घालविती। एक ते धुम्रपान साधविती। पंचाग्नि ताप एक ॥ ——

अशा प्रकारे कांही लौकिक कर्मे करावयाला लावतात तर कांही लौकिक कर्मे सोडावयाला लावतात, तर कांही वायुसी झुंजावे घ्यावयाला लावतात. एक अन्न सोडावयास सांगतात, तर एक संसार सोडावयाला सांगतात. "एक तें जटा वाढविती। एक ते बोडखेचि ठेविती ॥ एक ते केस लुछवती। नेणती कर्मं पशू सम ॥ एक उभे रहायला सांगतात तर एक 'उठोचि नको' असे म्हणतात. एक डोळे झाकून बसावयाला सांगतात तर एक डोळे उघडे ठेवून बसावयाला सांगतात. अशी परस्पर विरोध असणारी ही साधने सर्व व्यर्थ होतात असे त्यांचे प्रामाणिक मत आहे. ते म्हणतात 'एका अमृतज्ञानावाचून। ते सर्वही अकारण। जव नव्हे एक चैतन्यधन। तव सर्व साधनें व्यर्थ ते ॥ ऐसी नाना साधने साधविती। ते गुरू परि सद्‌गुरू न होती ॥ जे स्वये परब्रम्ह करिती। ते सद्‌गुरू जाणावे ॥ ऐसिया सद्‌गुरूसी जावे शरण दीक्षा घ्यावी धरोन ॥ नित्य प्रसाद तीर्थ सेवन ॥ करावा क्रिया मार्गे ॥ अशा या भोंदू गुरू पासून साधकांनी (कल्याणेच्छुनी) दोन हात दूरच राहिलेले बरे असे त्याना वाटते. व असे अनेक मतमतांतरे दाखवून स्वतःच्या नादी लावणाऱ्या गुरूचा त्यांनी निषेधच केला आहे.

पण मन्मथ स्वामी सामान्य जनांना गुरूभक्त बनावयाला सांगतात ते ज्ञानी व आचारयुक्त अशाच गुरूचे भक्त बनण्यास सांगतात व याच गुरूची दीक्षा घेण्यास ते सांगतात. त्यांची गुरू भक्ति अलोट प्रेमाने जी वाहते ती या दोन गुणांनी युक्त असणाऱ्या गुरूशीच.

मन्मथ स्वामींची ही गुरुभक्ति त्यांच्या वाङ्मयातून कोठेही दिमाखाने चमकत असली तरी या गुरूभक्तीचे माऊंट एव्हरेस्ट हे परमरहस्याच्या पहिल्या व दुसऱ्या अध्यायातच दिसून येते म्हणून हिमालयात ज्या प्रमाणे मनाला मोहून टाकणारी अनेक हिमाच्छादित पांढरीशुभ्र शिखरे दिसत असली तरी ज्याचे शिखरच मानवाला दिसू शकत नाही अशा त्या एव्हरेस्टच्या अत्यूच्च योग्यतेनेच हिमालय हा 'हिमालय' आहे. त्याचप्रमाणे परमरहस्याच्या अनेक अध्यायातून व इतर ग्रंथातून व अभंगातून गुरू गौरव जरी असला तरी गुरूची उच्चतमता, दिव्यता व भव्यता जर कुठे असेल तर ती परमरहस्याच्या पहिल्या व दुसऱ्या अध्यायातच.

परमरहस्याची सुरवातच गुरूभक्तितून आहे. खरं म्हणजे जगातील कोणत्याही धर्मात गुरुला महत्व आहेच पण वीरशैव धर्मात गुरुला विशेष महत्व आहे, वीर-शैवाच्या उपास्यदेवता पेक्षाही जास्त महत्व आहे. "कोपे शिवाच्या गुरुतारी। गुरु कोपे कोणी ना तारी ।। ही वीरशैवाची गुरुबद्दलची धारणा आहे. शिशूला जसं त्याच्या जीवनांत त्यांच्या मातेची आवश्यकता असते. तिच्याशिवाय तो जगूच शकत नाही. तद्वतच या अध्यात्मिक जीवनांत व भक्तिसाम्राज्यात गुरू शिवाय भक्त जगूच शकत नाही. शिशू सारखीच त्याचीं आवश्यकता असते. ही भक्त जीवनातली आवश्यकता स्वामीला ओळखू आल्यामुळेच की काय त्यांनी प्रथम गुरू महात्म्य व गुरुभक्तिच सांगितलेली आहे. हा गुरुभक्तिचा ओघ त्यांचा स्वाभाविक असल्यामुळेच त्यांनी आपल्या पार्वती देवीला देखील परमरहस्याच्या सुरूवातीला गुरु महात्म्यच सांगितलेलं आहे. यात स्वामीनं मोठं औचित्य साधलेलं आहे. दुसरे अनेक धर्मपंथाचे अनेक तत्व-ज्ञानपर ग्रंथ आहेत. दत्तानी सांगितलेली गोरक्ष गीता घ्या, कृष्णाची भगवद्गीता घ्या – शिवाजी शिव गीता घ्या किंवा रामाची रामगीता ( हनुमान गीता ) घ्या. असा तत्वज्ञानाचा कोणताही ग्रंथ घ्या. त्यात त्या त्या प्राश्निकांनी प्रथमत: गुरू महात्म्य विचारलेलेच नाही. पण मन्मथ स्वामीनी शिष्याच्या स्वरूपात उभा केलेली उमा इतरासारखं सुरुवातीला काही न विचारता 'गुरु महात्म्यच विचारते.' आणि आपल्या श्रोत्याला मन्मथ स्वामी पण तसंच सांगतात. "आदि पुसेल गुरु महात्म्य। मग पुसेल परम रहस्य उत्तम ।। असा त्या उमेचा दृष्टीकोन मन्मथस्वामी प्रथम सांगूनच गुरु महात्म्याचे वर्णन करतात.

जन्मलेलं गाईचं वासरु किंवा हरणाचं पाडस उठताच प्रथम मातेकडे जाऊन स्तनपान करावयाला सुरूवात करतं त्याच्या पायात दृढपणे उभा राहण्याचं अवसान आलेलं नसताना सुद्धा ते वासरू किंवा पाडस जन्मून उठता क्षणीच स्तनपानासाठी

धडपड करतं कारण त्याला माहीत असतं की, मातेच स्तनपान आपण केल्याशिवाय भक्ताला भक्त म्हणून सामर्थ्यंच येत नाही.

अशी ही मन्मथ स्वामींची असलेली गुरूभक्ति ही शिवभक्तिच आहे. त्यांचा गुरु आणि शिव दोन नाहीतच "शिवतोचि गुरु। गुरुतोचि शिव॥" अशी त्यांची धारणा आहे. त्यांचा गुरु अगोदर अनाम असा आहे. त्या गुरुला 'नागेश' हे मिळालेलं नांव भक्तांनी दिलेलं आहे. ज्या प्रमाणे बालकाच्या खेळात चिचूक्यालाच जसं पैशाचं नांव प्राप्त होतं तद्वतच अनाम अशा वस्तुला नागेश हे नांव प्राप्त झालेलं आहे. (याचा अर्थ त्यांचा नागेश हा चिचूका आहे असा मात्र नाही. तो चिचूकाही व चिचूक्या सारखाही नाही.) ते म्हणतात "तुज रुप ना रेखा नाम। आम्ही भक्ति धरोनि ठेविले नाम॥ येन्हवी वेद शास्त्रासी अगम्य॥ अगोचर तू॥" असा त्यांचा गुरु आहे. नागेश हे तुझे आडनाव आहे व तेही आम्ही भक्तिभावाने ठेविलेले आहे असे ते म्हणतात.

मन्मथ स्वामीचा हा गुरु सर्व समर्थ आहे. अशा त्या गुरुचे वर्णन करतांना स्वामी म्हणतात "जो परमात्मा परमेश्वरु। तोचि सदाशिव सर्वा गुरु॥ तोचि मुक्तिचा उदारू निज भक्तासी॥ तोचि ज्ञान विज्ञान दायक॥ तोचि कर्मधर्मासी साह्यक॥ तोचि तीर्थ व्रतासी नायक॥ सदगुरु तोचि जाणिजे॥" असा हा त्यांचा सदगुरु शिव-स्वरुप असून भूक्तिमूक्ति देणारा, ज्ञानविज्ञानाची प्राप्ती करून देणारा व सर्व धर्म-कर्माला साह्यक असा आहे. अशाच सदगुरुला ते नमन करतात. ("जो सद्गुरु सदाशिव कर्ताहर्ता। ऐसिया सद्गुरूसी नमो नमो॥")

असा हा मन्मथ स्वामींचा सद्गुरु ज्ञान विज्ञानदायक असून संपूर्ण ब्रम्हांडात व्यापून राहणारा आहे. जड जगाला चैतन्यमय करण्याचे सामर्थ्य त्याचेच आहे. तो शाश्वत असून त्याला षड्विकार व षड्उर्मी नाहीत. तो व्योमातित असून निरंजन आहे. नाद, बिंदू व कला या तत्वा विरहीत तो आहे. तो निर्मल व त्रिगुणातीत असून सर्वजण त्याच्याच पायाला नमस्कार करतात. असा हा त्याचा सद्गुरु आहे.

सूर्यात अंधःकाराचा नाश करण्याचे अज्ञात सामर्थ्य असते. तसेच मन्मथ स्वामीने वर्णिलेल्या सद्गुरुत अज्ञानाचा नाश करण्याचे सामर्थ्य आहे. मन्मथ स्वामींची अज्ञा-नाची कल्पनाही मोठी मजेदार आहे. अज्ञान म्हणजे ज्ञानाचा अभाव ते मानित नाहीत. दुःख म्हणजे जसं सुखाचा अभाव नाही किंवा वैरत्व म्हणजे मित्रत्वाचा अभाव नव्हे. तद्वतच अज्ञान म्हणजे ज्ञानाचा अभाव ते मानीत नाहीत. कारण अज्ञान जर ज्ञानाचा अभाव असता तर अज्ञानाचा छेद करणे हे हास्यास्पदच ठरलं असतं.

सर्व देव शिवापासून उत्पन्न झालेले सर्व ब्रम्हांड शिवातच सामावलेले असते. सर्व देव अवतार गुरूच्या आज्ञेतच वर्ततात असा त्यांचा सिद्धांत आहे. " ब्रम्हा विष्णू आणि महेश। हेही श्री गुरुचे अंश॥ तेही ध्यानी श्री गुरूस॥ या लागी गुरूसी नमो नमो॥" असा हा त्यांचा सद्‌गुरू म्हणजे साक्षात् परमशिव परमात्माच होय "गुरू तोचि महादेव। गुरूतोचि सदाशिव॥ गुरू परता नाही देव॥ म्हणूनि श्री गुरूसी भजिजे॥"

असा हा मन्मथ स्वामींचा सद्‌गुरू सर्व समर्थ असला तरी तो अनेक मुखी नाही. त्याला एकच तोंड आहे. दोनच हात आहेत व दोनच डोळे आहेत. त्यांचे हात भक्तांना अभय देण्यासाठी व आशीर्वादासाठी आहेत त्यांचे डोळे भक्ताकडे कृपादृष्टीने पाहण्यासाठी आहेत. व त्यांचे तोंड भक्तांना वर देण्यासाठी आहे. गुरू जर अनेक मुखाचा असता तर त्यांनी भक्तांना दिलेलं वरदान खर ठरलंच नसतं. दिलेलं वरदान खर ठराव म्हणून त्याला एकच तोंड आहे. हा स्वामीच निरूपणाला ओध आहे, आणि हा ओध संयुक्तिक पण वाटतो कारण येवढं अफाट सामर्थ्य असणाऱ्या गुरूला अनेक तोंड धारण करण्याची आवश्यकता काय ?

अशा गुरूची गुरू पूजाच श्रेष्ठ का याचे विवेचन करताना स्वामीजी म्हणतात "एका गुरूचे पुजे करून। त्रय मुर्तीचे घडे अर्चन॥ तया श्री गुरू लिंगा व्यापून। माझे रूप असे॥" गुरू, लिंग आणि जंगम या त्रय मुर्तींची पुजा एका गुरू पुजेत घडते म्हणून गुरू पुजा ही सर्वात श्रेष्ठ पुजा होय असे ते मानतात.

अशी ही मन्मथ स्वामींची गुरुभक्ति म्हणजे सर्व पूजेत श्रेष्ठ भक्ती होय. त्यांचा शिव सुद्धा 'माझे भक्त मला प्रिय आहेत.' असं न म्हणता "ऐसे जे गुरू भक्त पार्वती तयाची अत्यंत मज प्रिती॥ असे म्हणतात.

# प्रतिकर्ण !

--श्री. पां. वा. भुतकर.
२३ । १६७५
अभ्युदयनगर, काळाचौकी,
मुंबई–४०० ०३३.

दानशूर म्हटले की आपणास सहाजीकच महाभारतातील कर्णाची आठवण येते. कर्ण आपल्याकडे आलेल्या याचकास रिकाम्या हाताने कधीच परत पाठवित नसे. स्वतःच्या जीवीताची पर्वा न करणारा व याचकाला सूर्याने दिलेली कवचकुंडले काढून देणारा कर्ण ज्याप्रमाणे अजरामर झाला त्याचप्रमाणे साईबाबा देखील दानशूर म्हणून प्रसिद्ध झाले.

साईचरित्रात याबाबत पुढीलप्रमाणे लिहून ठेवले आहे.

साईबाबा महासंत ।
धीर उदार आणि दान्त ।
यात्रेकरूंसी कृपावंत ।
पैसे अत्यंत वाटिती ॥
दिडक्या चवल्या हाताचा कीस ।
अधेल्या–पावलांचा पाऊस ।
रुपये दहा कोणास वीस ।
कोणास पन्नास ते देत ॥

याप्रमाणे बाबा हे दररोज लोकांना पैसे वाटीत असत. अर्थात् कर्णाच्या दातृत्वात व बाबांच्या दातृत्वात फार मोठा फरक होता. कर्ण आलेल्या याचकाला त्याची पात्रता न पहाता मुक्त हस्ताने दान देत असे. शेवटी योग्य अयोग्य न पहाता दिलेल्या दानामुळेच त्याचे जीवीत संपुष्टात आले व आयुष्यभर केलेल्या दानामुळेच दानशूर ही बिरुदावली त्याच्या नावामागे कायमचीच लागली.

बाबांची दान देण्याची पद्धत ही फार वेगळी होती. दान देताना ते फार विचारपूर्वक दान देत असत. खरोखरच ज्याला पैशाची गरज आहे, अशाच लोकाना बाबा दान देत असत. काही लोकांना मात्र ते दररोज पैसे वाटीत असत. उदा. पीरमहंम्मद

(पान ४९ वर)

६५ व्या वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन!

# श्री सद्गुरु ताजुद्दीन बाबा

—सौ. वसुंधरा देशकर नागपूर
संकलन सहाय्यक
श्री. गणपतराव सामंत
व्यवस्थापक श्री महालक्ष्मी मंदिर, मुंबई

"सुहास्यवदन संत श्रीताजुद्दिनबाबा" हा माझा लेख 'श्रीसाईलीला' आक्टोबर ८२ च्या अंकात प्रसिद्ध झाला. असंख्य भक्तांनी या लेखाबद्दल माझे पत्राद्वारे अभिनंदन केले. अनेक साईभक्त भेटले. श्रीताजुद्दिनबाबांची जन्म कहाणी कळावी म्हणून साईभक्तांचा आग्रह झाला.

श्रीताजुद्दिन बाबांचे दोन वर्षात मी बरेच अनुभव घेतले. हल्लीच आपल्या भक्तांचा असाध्य आजार त्यांनी स्वतःकडे घेऊन त्यास व्याधिमुक्त केले व स्वतः गत प्राण होऊन बिछाना धरला. हे प्रकार मुंबईत घडले. मी अनुभवले.

श्रीताजुद्दिनबाबांचे चमत्कार मी स्वतः पाहिले, अनेक चमत्कार ऐकले पण त्यांचा जीवनवृत्तांत मला फारसा ज्ञात नव्हता. पण तो लिहावा अशी माझी तीव्र तळमळ होती. अशाच क्षणी माझा वरील लेख सौ. वसुंधरा गोपाळराव देशकर (देशकर आई) यांनी वाचला व तोच लेख संत श्रीगुलाबबाबा व श्रीताजुद्दिनबाबा यांना वाचून दाखविला. या संतद्वयाना गहिवरून आले व लगेच श्रीताजुद्दिनबाबांच्या आज्ञेवरून देशकर आईनी श्रीताजुद्दिनबाबांचा जीवन-वृत्तांत लेखी पाठविला.

देशकर आई श्रीताजुद्दिनबाबांच्या समवेत येथे श्रीमहालक्ष्मी दर्शनार्थ आल्या असतांना माझा अल्पपरिचय झाला देशकर आईनी श्रीताजुद्दिनबाबांचे जीवन फारच जवळून पाहिले आहे व त्यांना नेहमी सत्संग घडतो. वं. बाबांनी १३ वर्षे तप केलेली हजरत ताजुद्दिन अवलियांची गादी देशकर आईच्या घरी आहे.

श्रीसाईबाबा, शेगांवचे श्रीगजानन महाराज व नागपूरचे सुप्रसिद्ध अवलिया संत हजरत श्रीताजुद्दिनबाबा हे समकालीन श्रेष्ठ संत. श्रीताजुद्दिनबाबांचा जन्म १७ जानेवारी १८६१ रोजी झाला व १७ ऑगस्ट १९२५ रोजी त्यांनी देह

त्याग केला. अजमेर शरीफ, हाजीमलंग प्रमाणेच श्रीताजुद्दिनबाबांचे नागपूर-मधील ताजबाग शरीफ हे जागृत स्थान आहे.

याच अवलिया संत श्रीताजुद्दिनबाबांचा अवतार म्हणजेच हल्लीचे सुहास्य-वदन संत आण्णादास उर्फ श्रीताजुद्दिनबाबा. १७ ऑगस्ट १९२५ रोजी अवलिया ताजुद्दिनबाबांनी जीवनकार्य आटोपले. १४ जुलै १९१८ रोजी आण्णादास जन्मास आले. याच सत्यपरिस्थितीवर आधारित सौ. वसुंधरा गोपाळराव देशकर यांनी प्रकाशझोत टाकला, व त्यांनीच तो शब्दांकित केला. धन्य या देशकर आई. स्तुत्य त्यांचे खालील लिखाण.

श्री ताजुद्दिनबाबांचे मूळ नांव आण्णादास. त्यांचा जन्म १४ जुलै १९१८ रोजी नागपूर येथे सदरमधे त्यांच्या राहत्या घरी झाला. वडील श्री. मोतीलाल व मातोश्री श्रीमती बालम्मा यांचे उदरी हजरत ताजबाबांच्या कृपाप्रसादाने 'हे' शक्तिमान योगीराज जन्मास आले. त्यांचे पूर्ण नाव आण्णादास मोतीलाल शिवपेठ. जातीने मद्रासी. धंदा पिढीजात धोब्याचा. वडिल मिलिटरीत मोठे अधिकारी. घरचे गर्भ श्रीमंत. बाबा लहानपणी फार लाडात वाढले. वडिलांचे व आजीचे फार लाडके. बाबांच्या मातोश्री सध्या ११३ वर्षांच्या आहेत.

त्यांची आजी रोज हजरत ताजबाबांचे कपडे धूत असे. एकदा ती कपडे घेऊन गेली त्यावेळी बाबा तिला म्हणाले –

'बेटी तूने मेरी बहुत सेवा की है अब मैं ज्यादा दिन रहनेवाला नहीं' हे ऐकून आजी रडू लागली. तेव्हां बाबा म्हणाले 'रोती क्यूं? यह ले प्रसाद, तेरे बेटीको खिलादे. मैं तेरेही घर आऊंगा.' आणि प्रसादाबरोबरच एक मोठे मातीचे ढेकूळहि आजीस दिले. घरी परततानां वाटेत तिने ओझे नको म्हणून मातीचे ढेकूळ फेकून दिले.

घरी आल्यावर तिने मुलीला प्रसाद दिला आणि आजी झोपली. रात्रभर पदर सारखा टोचत होता. असेल काहींतरी म्हणून तिने लक्ष दिले नाहीं. सकाळी उठून काय टोचते म्हणून पाहू लागली तर पदराला बारीक बारीक सोन्याचे कण चमचमत होते. खूप हळहळली बिचारी. पुढे आण्णादासांचा व त्यानंतर चार मुले व तीन मुलींचा जन्म झाला.

पहिल्या नंबरचे आपले सर्वांचे लाडके आदरणीय "आण्णाबाबा" सर्व

भाऊ–बहिणी आपआपल्या घरी सुखात आहेत.

आण्णाबाबांना लहानपणापासून ताजबाबांचे वेड होते. घरी बाबांच्या फोटोला आण्णा उदबत्ती ओवाळीत, आरती करीत, भजन म्हणत, गल्लीतील चार पोरे गोळा करून बाबांचा नामगजर करीत. पुढे हजरत ताजबाबांनी १९२५ साली समाधि घेतली.

एकदा उत्सवाच्या दिवशी आण्णांच्या आजीने ताजबाबांच्या समाधिला, आण्णांना दर्शनार्थ नेले. समाधिसमोर पेढे, बर्फीची ताटे होती. खूप गर्दी होती आण्णाबाबांना समाधिवर हजरत ताजबाबा बसलेले दिसले व ते खुणेने आण्णांना बोलावित होते. आजीला सोडून आण्णा दुडूदुडू धावत समाधिकडे गेले. हजरत ताजबाबांनी त्यांना शर्टभरून पेढे दिले ते घेऊन आण्णा आजीजवळ आले. आजी धावरली कारण तिला वाटले आण्णानीच पेढे उचलून आणले. तिने विचारले कहाँसे लाया? तर आण्णा म्हणाले वो देख ताजबाबा वहाँ बैठे है। उन्होंने मुझे बुलाया और दिये मैं लाया। आजीला काहीच दिसले नव्हते.

पुन्हां ताजबाबांनी आण्णांना खूण केली ये म्हणून. शर्ट रिकामा करून परत स्वारीने धाव घेतली. ताजबाबांनी पुन्हां पेढे दिले. यावेळी आजीचे लक्ष होते. तिला ताजबाबा दिसले नाहीत पण पेढे नातवाने ताटातून उचलले नाहीत याची खात्री झाली, आणि तिचा अंदाज खरा झाला. 'हाच तो प्रसाद' याची प्रचिती येऊन आजी तेव्हांपासून आण्णांना जास्त जपू लागली. आधीच लाडके त्यात आणखी लाडाचे झाले. आण्णांना ती जिवापाड जपू लागली. त्यांचे खाणे-पिणे स्वतःच करी.

आण्णांना शिक्षणात रस नव्हता. जेमतेम चौथीपर्यंत शिकले. आवड कशी असणार? देवाच्या शाळेतूनच सर्व शिकून आण्णा जन्माला आले सर्वज्ञ बनून, शाळेला रामराम ठोकला. दिवसभर दंगामस्ती भजन–आरती जोरात सुरू झाली. पुढे आजीने त्यांना आखाड्यांत घातले. हळूहळू आण्णा कुस्तीगीर म्हणून चमकू लागले. पहिलवान म्हणून लोक ओळखू लागले. आण्णांचे पहिलवान मित्र अजूनही आण्णांना मोठ्या प्रेमाने "क्यूं पहिलवान" म्हणून प्रेमाने हाक मारतात. या पहिलवानाची खिलाई पिलाई (आटवलेले दूध, बदामाचा शिरा) आजी स्वतः करीत असे.

या परिस्थितीतही आण्णांचे जपतप चालूच होते. शर्यतीच्या अनेक कुस्त्या आण्णांनी जिंकल्या. लोक त्यांना पहिलवान म्हणून ओळखू लागले. आधीच वरचे श्रीमंत त्यात पहिलवानी रुबाब आजीचे वडिलांचे लाडके. वडिल खूप लाड करीत. सुंदर उंची कपडे, तरतऱ्हेचे सूट, चपला जोडे आणित. आण्णांच्या आई अजूनही सांगतात की आण्णांचे पंचवीस–तीस चपला बूट जोड रहायचे. बोलता बोलता गहिवरतात. कोटात चार-पाच अंगठ्या सोन्याची बटणे, गळ्यात गोफ असा थाट होता.

आण्णा वीस वर्षांचे असतांना त्यांचे लग्न झाले. पहिली मुलगी कुरकूर करून नाकारली. दुसऱ्यावेळी तसेच पण आजी आणि वडिल यांचेसमोर काहीं चालले नाहीं. शेवटी लग्न लागले. धर्मपत्नी सुंदराबाई त्यावेळी अकरा वर्षांच्या होत्या.

लग्न झाल्यानंतर एक दिवस ही स्वारी कुणाला न सांगता पसार झाली. ढाका–बंगालचा रस्ता धरला. ढाक्यापर्यंत गाडीने व पुढे पायी प्रवास सुरू झाला. फिरता–फिरता घनदाट अरण्यात शिरले. चालून थकल्यामुळे एक मंदिर दिसले म्हणून त्या मंदिराकडे निघाले. संध्याकाळ होती. मंदिरातच मुक्काम करावा म्हणून मंदिराकडे निघाले. वाटेत काटे, गोटे, विषारी किडे, विंचू, नागाची वारुळे स्वागताला होतीच. पायवाट काढीत मंदिरात पोचले.

अंधार होऊन गेला होता. मंदिरात तेलाचा दिवा जळत होता. मोठमोठी कोळीष्टके होती. आण्णा सांगतात तो दिवा कोणी लावला होता हे गूढच आहे. कोळी ताटाएवढे मोठे. आण्णा कोणाची मूर्ती म्हणून जवळ गेले. ती उग्र मूर्ति अष्टभूजा देवीची होती. भव्य–दिव्य मूर्तिला नमस्कार करून आण्णा तेथेच विश्रांतिसाठी लोटले. अतिश्रमाने लवकरच झोप लागली. सकाळी उठून पाहतात तर आण्णांच्या अंगावर काटे आले, आपण येथे कसे काय आलो आणि रात्रभर तरी कसे झोपलो? असे आण्णांना वाटले. आण्णा उठले व आईजवळ गेले. भाराऊन पायावर डोकें ठेवले. तिनेच आण्णांना रात्रभर सांभाळले होते. हातात पाहतात तर रक्ताने भरलेली तलवार. आईच्या नजरेला नजर दिली तेव्हां आई हसली आणि आण्णांच्या कपाळाला रक्ताचा टिळा लावला, व एक माळ आणि साडीचा पदर दिला. इथेच आण्णांना दिव्यशक्ति भेटली.

आईचा आशिर्वाद घेऊन आण्णा पुढच्या प्रवासाला निघाले. वाटेत कंदमुळे

खावीत. झऱ्या–ओढ्याचे पाणी प्यावे व थकवा गेला की पुन्हां चालावे. आईच्या कृपा प्रसादाने हे मूर्तिमंत चैतन्य आपला मार्ग काढीत चालले होते.

बरेच दिवसानंतर एक मठ दिसला. आण्णा मठात गेले. मठात एक भले मोठ्ठे पोट असलेले साधू आपल्याच जटांचा बिछाना करून त्यावरच उताणे झोपले होते. त्यांचे वय त्या सुमारास सातशे वर्षांचे असावे असे आण्णा सांगतात. पापण्या वीतभर लांब, नखेही तशीच मोठमोठी. त्यांचे शिष्य पापण्या वर उचलीत तेव्हां ते पाहू शकत. त्यांचे खाणे म्हणजे एक शेराचा कंद. असे कंद धूनीत भाजून ते पानाच्या द्रोणात दुधात कुस्करून खात. तेच भोजन सर्वांना असे. आण्णांना पाहून त्यांना आनंद झाला. आण्णा त्यांच्याच सेवेत काहीं दिवस राहिले. एक दिवस ते आण्णांना म्हणाले – बेटा तुझे इथले काम झाले आता तू पुढे, प्रवासास लाग – आणि प्रसाद म्हणून दोन दिव्य मणी त्यांनी आण्णांना दिले.

साधूचा प्रसाद, आशिर्वाद, आईचा प्रसाद घेऊन ही स्वारी पुढच्या प्रवासास निघाली. बाबाच होते म्हणून या सर्व दिव्यातून बाहेर पडले. अशी सात–आठ वर्षे भ्रमंती करून आण्णा नागपूरास परतले. पुन्हां लगेच घर सोडून निघाले. कलकत्ता, खडकपूर, पुलगाव येथे पांच–सहा वर्षे मिलिटरीत राहिले. या अवधीत आण्णांचे वडिल व आजी निधन पावली.

आण्णांची आई सुंदराबाईचा अतोनात छळ करीत असे. आण्णा जेव्हां परतले तेव्हां बायकोचा छळ पाहून तिला घेऊन बिलासपूर, भिलाई, गोबरखाडी येथे राहिले. त्यांचा गृहस्थाश्रम सुरू झाला. जपतपात कधीच खंड पडला नाहीं. आण्णांना रामबाई, मोतीलाल व रमेश अशी तीन अपत्ये झाली. सर्वांस घेऊन परत नागपूरास आले व आईजवळ राहू लागले. चरीतार्थ हॉटेल व लॉंड्री लावली. देवभोळेपणामुळे हॉटेल लवकरच बंद पडले. लॉंड्रीही यथातथाच चाले. तीच मद्रास लॉंड्री आजहि घाट रोडवर मोठ्या दिमाखात उभी आहे. ती आता मुले चालवतात. चांगली चालते.

आजी–वडिल वारले. तसे पारडे फिरले. घरांत मुलाबाळांचा, बायकोचा छळ सुरू झाला. शेवटी आण्णा त्रासाने मुले व बायको घेऊन माणकापूरास चंद्रमौळी झोपडीत राहू लागले. माणकापूरास आल्यावर आण्णांना किशोर, सुशीला, पापा, कमला व बबू ही अपत्ये झाली.

आण्णांचे लक्ष संसारात कधी रमले नाहीं आणि दिवसे-दिवस ते विरक्त होत चालले. या सर्वांचा परिणाम शेवटी मुलाबाळांवर उपाशी पोटी राहाण्यावर आला. पीठाची लापशी करुन सुंदराबाई वाढीत. एकदा आम्ही आण्णांच्या घरी गेलो, व ते सर्व पाहून भडभडून आले. आजहि आठवण येते. केविलवाणी मुले, उदास बायको. घरात दोन-चार भांडी, झोपण्यासाठी गोधड्या, पोती, दोन–चार काचेचे कप. आण्णांनी बायकोला चहा करायला सांगितला. ती खूप लाजून गेली. आण्णा दूध नहीं है. आण्णा म्हणे काली बनाना. तो काळाच चहा होता पण त्याची चव वेगळीच होती. इतका चवदार चहा कधीच पिण्यात आला नाहीं.

आण्णांनी अती खडतर अशी १२ मोठी व्रते व लहान-मोठी व्रते मिळून ३० व्रते केली. — तपे केली. त्यात त्यांना संकटे आली. पण कोणत्याहि प्रसंगी आण्णा ताजबाबांना कधीहि विसरले नाहींत. त्यांच्या या तपश्चर्येचे फळ आज त्यांना भरपूर मिळत आहे. आण्णांनी तेरा वर्षे झोपच घेतली नाहीं. एकावन दिवसाचे व पुन्हां एकेचाळीस दिवस अखंड उभे रहाण्याचे व्रत केले, दोनदा-मौन व्रत स्वीकारले. कुणी काहीं दिले तर खावे–प्यावे नाहींतर उपाशीच रहावे. शेवटच्या तीन–चार दिवसात आण्णांना फार त्रास झाला पण यातूनही ते पार पडले. ऐन पावसाळ्यात चंद्राचे व्रत केले. चंद्रदर्शन झाल्याशिवाय अन्नपाणी घेत नसत. कधी कधी तीन तीन चार चार दिवस चंद्रदर्शन होत नसे. रात्रीला अडथळे म्हणजे रात्री मोठे वाघ, भुजंग व जंगलच असल्यामुळे मोठमोठे किटाणू आण्णांच्या सोबतीला असत. पण अशाहि परिस्थितीत आण्णांनी आपली उभे राहाण्याची जागा सोडली नाहीं. आज त्याच जागेवर खूप उंच खांब्यावर झेंडा फडकतो आहे. आणि वाकीचे लोक झेंडेवाले बाबा म्हणून आण्णांना ओळखतात. मौनव्रत, एवढा मोठा गृहस्थीचा पसारा यांना न डगमगता सर्व आपत्तिनां तोंड देऊन ते उभे राहिले.

असा हा महान शक्तीशाली तपस्वी आज सर्वांसमोर सर्वांची संकटे उचलण्यास झोळी पसरून उभा आहे हे सर्वांना माहित आहे. आण्णाच होते म्हणून कसोटीला उतरले. चिरंजीव झाले. पू. गुलाबबाबांचे लाडके झाले. किती अपमान मानहानि सोसली आण्णांनी, अजून संपली कां? नाहीं, अजून सत्त्वपरिक्षा चालूच आहे.

एकदा व. गुलाबबाबा म्हणाले, आण्णा आता तुम्हांला व्रताची जरूरी

राहिली नाहीं. तुम्ही व्रत करू नका. हिरा आहे माझा आण्णा. वं. गुलाबबाबांचे हे उद्‌गार ऐकून धन्य वाटले आण्णावर त्यांचे खूप प्रेम आहे. काटेलला त्यांनी पांच उंबरावर आण्णांना थांबण्यास जागा दिली आहे. पांच उंबरठे स्थान वं. गुलाबबाबांची तपोभूमी आहे. वं. गुलाबबाबांनी त्यांना खूप कसोटीला लावले पण आण्णा त्यातही पूर्ण उतरले. ताजबाबांच्या व गुलाबबाबांच्या कृपाप्रसादाने आण्णांनी वाकीला 'शांतिधाम' आश्रम बांधला आहे. नावासारखाच शांत व सुंदर छोटासा आश्रम आहे. आश्रमाचे काम चालू असताना अण्णांना फार त्रास झाला. आडवाट असल्याने वाहने जात-येत नाहींत. रस्ता खूप खराब व कच्चा. पाण्याची सोय नाहीं. पैसा नाहीं. पैशासाठी खूप मानहानि सहन केली. अत्यंत सरळ स्वभाव असल्यामुळे मजूरानीही त्रास दिला. त्यांना पूर्ण मजूरी, दोन वेळचे जेवण, बिडी, तंबाखू, पानसुपारी, पीनेवाला असला तर तेहि पुरवित. आण्णा सामानासाठी नागपूरला आले की हे मजूर स्वस्थ बसून दिवसभराची मजूरी दाबून घेत. आण्णांनी स्वतः माती गाळण्यापासून घमेले उचलणे, विटा उचलणे, अशी सर्व कामे केली. आश्रम उभा राहिल्यावर रंगही लावला.

ते झाडझूड करीत, मजूरासाठी बेसन भात शिजवित असत. आश्रम जेव्हां पूर्ण रूपात उभा झाला, लाईट आले तेव्हां केवढा आनंद. काम करतांना आण्णांच्या उजव्या हाताला व पायाला दोनदा नाग चावले पण काम बंद केले नाही. लोक तर म्हणाले हा बुवा वाचणार नाहीं. कधी कधी उपाशीच झोपायचे. एकटेच झाडाखाली रहायचे. त्यांच्या कष्टाला मोल नाहीं. आश्रमाचे काम चालू असतानाहि काटेलच्या यात्रांना न चुकता जात असत. कोराडी घाट रोडवर भिकारी भोजन, संदल ताजबागचा चालूच असे. या भंडाऱ्यात पंधरा ते वीस हजार गरीब जेवतात. आण्णा स्वतः सर्व जातीने करतात. वं. गुलाबबाबा यावेळी हजर असतात.

एकदा कोराडीला रात्री नवरात्रात नवमीला दीड वाजता वं. गुलाबबाबा आले होते. भिकार भोजन आटोपून आवरा आवर करून आम्ही बाबांची वाट पाहात बसलो होतो. बाबा आले पंगत बसली आणि साक्षात् कोराडीच्या आईने दोघानांहि आपल्या हाताने जेऊ घातले. असा हा कणखर वृक्ष डौलाने ताठ उभा आहे आणि भक्तरूपी फांद्या–फळा–फुलांनी डवरला आहे. आण्णा भक्तांच्यासाठी धावून जातात. फार दूर असेल तर स्वप्नात दर्शन देऊन संकट दूर करतात.

आण्णांनी भक्तांचे दुर्धररोग बरे केले आहेत. प्रसादाने मुले झालेली आहेत आंधळ्यांना डोळे आले आहेत. महारोगी चांगले झाले आहेत. हे सर्व कष्ट उचलतांना आण्णांचे फार हाल होतात. बघवत नाहीं. आण्णांचे भक्त नागपूर, भंडारा, विलासपूर, व आसपासची खेडी, सूरत, पुणे, मुंबई, कलकत्ता, अहमदाबाद, हरयाना, दिल्ली, बेहरीन, लखनौ या जागी जास्त प्रमाणात आहेत.

एका काळी अती खडतर व्रते-तपे करुन फार उग्र स्वरूपाचे आण्णा होते. म्हणून नागपूरचे जुने भक्त अजूनहि आण्णांना घाबरतात थरथर कापतात. परंतू वं. गुलाबबाबांच्या सान्निध्यात राहून आण्णांचा उग्रपणा पूर्णपणे गेला व आता आण्णा खूप शांत व प्रेमळ झाले आहेत. त्यांचा कडकपणा आठवला की अजून शहारे येतात. पूर्वीचे आण्णा व आतांचे आण्णा यात परिवर्तन झाले आहे. ते होण्यास वं. गुलाबबाबांची कृपा.

आण्णा मला नेहमी म्हणायचे माँ तू काहीतरी लिही. तुलाच लिहाव लागत आणि मला नेहमी वाटायच मी काय लिहिणार? तुम्हीच शक्ति द्या तर जमेल. आणि ही त्यांचीच कृपा-आशिर्वाद.

त्यांचे अल्पचरित्र मजसारख्या बुद्धिहिनेकडून त्यांनी लिहून घेतले. हजरत ताजबाबा व वं. गोपालकृष्ण गुलाबबाबांच्या चरणी ही एक छोटीशी पुष्पपाकळी अर्पण करते आणि पदर पसरून हेच मागणे मागते की आण्णाबाबांना उदंड आयुष्य आरोग्य, किर्ती व वैभव लाभो. सर्व भक्तांचे लाडके आण्णा नेहमी सुखात राहोत.

(वरील लिखाणात आण्णा म्हणून संबोधिले आहे तेच सध्याचे सुहास्यवदन संत श्री. ताजुद्दिनबाबा.)

★

# गुरुपौर्णिमा

रविवार ता. २४ जुलै १९८३ रोजी आपल्या महाराष्ट्रात गुरुपौर्णिमा हा उत्सव सर्वत्र थाटात साजरा केला जाईल. या पौर्णिमेला 'व्यास पौर्णिमा' असे दुसरे नाव आहे. आपल्या हिंदु धर्मामध्ये प्रत्येक पौर्णिमेला निरनिराळी नावे आहेत. या पौर्णिमेच्या मागची जी पौर्णिमा झाली तिला वटपौर्णिमा हे नाव होत आणि आता या पुढील जी पौर्णिमा येईल तिला नारळी पौर्णिमा असं नाव आहे. भाद्रपद महिन्यातील जी पौर्णिमा तिला प्रौष्ठपदी पौर्णिमा' अस म्हणतात.

आषाढ महिन्यातील साजरी केली जाणारी जी ही गुरुपौर्णिमा आहे ती महाभारत, वेद व पुराणे यांचा जन्म ज्यांचे पासून झाला त्या व्यासमुनींच्या स्मृतीप्रित्यर्थ साजरी करण्याची प्रथा आहे.

"व्यासोच्छिष्टम् जगत् सर्वम्" असे नेहमी म्हटल जाते. याचा अर्थ असा की जगातील सर्व ज्ञानसंतांनी जे ज्ञान लोकांपुढे ठेवल ते ते सारे महर्षि व्यासांच्या मुखातून आलेल आहे. ज्ञानियांचा राजा म्हणून ज्यांना मानतात त्या ज्ञानदेवांनी सुद्धा ज्ञानेश्वरी लिहिताना ".व्यासांचा मागोवा घे तु" अस म्हणून सुरुवात केली आहे.

सर्व संतांनीच अत्यादर दाखविलेल्या या महर्षि व्यासांच खरखुर नाव कृष्ण द्वैपायन व्यास. त्यांचा जन्म एका बेटावर झाला म्हणून 'द्विप' हे नाव त्यांच्या नावापुढ लावल गेल. ते काहीसे सावळे होते म्हणून त्यांचे वडील त्यांना 'कृष्ण' या नावाने हाक मारीत असत. महर्षिव्यास हे पराशर नावाचे एक महामुनी होऊन गेले त्यांचे पुत्र होत.

वेद हे आम्हां हिंदूंचे परमपवित्र असे ग्रंथ आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्व वेद या चार वेदां शिवाय रामायण व महाभारत हे आम्हां हिंदूचे अतिशय महत्वाचे व परमपवित्र असे ग्रंथ आहेत. रामायणाची रचना मुनी वाल्मिकीने केली तर महाभारताची रचना व्यास महर्षिनीं केला. साक्षात् श्री गजाननही व्यासांवर प्रसन्न होते. गणपती लेखन करीत आहेत व व्यास कथन करीत आहेत अशी चित्र आपण पहातोच. रामायण हे जसं महाकाव्य आहे तसच महाभारत ही महाकाव्यच आहे. कौरव पांडवांच्या ऐतिहासिक

लढाईच वर्णन यात आहे आणि अशा या ग्रंथाची रचना करणारे व्यासजीच होत.

व्यास याचा अर्थ संपादक असा एका पंडिताने केला आहे. व्यासांनी भारतातील विखुरलेल्या साहित्याचे एकत्रीकरण केले, ते क्रमवार लावले व संग्रहीत करून ते ग्रंथरूपाने संपादन केले म्हणून व्यास या नावाचा अर्थ संपादक आहे अस तो पंडित म्हणतो. असा हा जो पंडित आहे त्याचे नाव आहे भगवत शरण उपाध्याय.

महाभारता प्रमाणेच पुराणांचेही संपादन करण्याचे अतिशय कठिण व किचकट असे काम व्यासांनी केल. आपल्या भारताचा अती प्राचीन असा इतिहास याच पुराणाद्वारे आपल्याला मिळतो. त्यांनी भारतातील सर्व ऋषिंची व राजांची कुळ व वंशपरंपरा शोधून काढली. व्यासांनी रचलेल्या महाभारतात एक लाखावर श्लोक आहेत. म्हणूनच की काय या महाभारताला 'शत सहस्त्री संहिता' अस म्हणतात. केवढ्या प्रचंड प्रमाणात त्यांनी ही रचना केली आहे ते पहा! आणि म्हणूनच की काय व्यासांच्या बाबतीत नेहमीच म्हटल जात.

"नमोस्तु ते व्यास विशाल बुद्धे
फुल्लार विंदायत् पत्रत्र नेत्र ।
येन त्वया भारत तैल पूर्ण:
प्रज्वालितो ज्ञानमय प्रदीप:"

अस म्हणून व्यासांना वंदन करण्याचा प्रघात आहे. या श्लोकाचा अर्थ असा फुललेल्या कमळासारखे ज्याचे आकर्षक नेत्र आहेत. ज्यांची बुद्धि विशाल आहे अशा हे व्यासमुने तुम्ही भारतरुपी तेलाने भरलेला ज्ञानदीप प्रज्वलित केलात त्या तुम्हाला माझा नमस्कार असो—

तेव्हा ज्ञानदानाचं गुरुत्व व्यासांच्याकडे येत म्हणून व्यासांच्या स्मृतीस वंदन करून त्यांच्या पासून आपण विद्या ग्रहण करतो म्हणून सर्व सुशिक्षित व सुसंस्कृत जनता त्यांचे विषयी या दिवशी कृतज्ञता व्यक्त करते.

व्यास हे आपले पहिले गुरु होत. गुरुचा महिमा मोठा आहे. साने गुरुजींनी म्हटल आहे की गुरु आपणास ज्ञानाच्या गाभाऱ्यात घेऊन जातो व ज्ञानाशी एकरूप करून टाकतो. गुरु म्हणजे उचंबळणारा महासागर! सत् शिष्याचा

मुखचंद्रमा पाहून गुरु हा हेलावत असतो जलाशयात पाणी पुष्कळ आहे. घटानं आपली मान विनम्र केल्याशिवाय तो त्यात घेऊ शकणार नाहीं. त्याच-प्रमाणे गुरुजवळ शिष्यानं विनम्र झाल्याशिवाय त्याच्यात ज्ञानकण येणार नाहीत हे तुम्ही सदैव लक्षात ठेवा. गुरुचा महिमा मोठा आहे आणि म्हणूनच की काय भगवान श्रीकृष्णांनी आपले गुरु सांदिपनी यांच्या घरी लाकडे वाहिली होती. भगवान दत्तात्रयाने आपले शंकर गुरु मानलेले आहेत. तुम्हांला सुद्धा आता-पर्यंतचे शिक्षण घेत असताना अनेक गुरु भेटले असतील आणि म्हणूनच अस म्हटल आहे.

गुरुब्रम्हा गुरुर्र विष्णू
गुरु देवो महेश्वर:
गुरुर् साक्षात् परब्रम्ह
तस्मै श्री गुरुवे नम:

महर्षि व्यास आपले अगदी पहिले गुरु असल्यानं आपण त्यांना त्यांच्या आजच्या या स्मृतिदिनी वंदन करू या आणि हे व्यासमुने आपल्या सारखीच प्रगाढ बुद्धिमत्ता आम्हांला दे, प्रचंड प्रमाणात ग्रंथ रचना करण्याच सामर्थ्य आम्हांला दे अशी प्रार्थना आपण करू या.

# गुरुपौर्णिमा प्रसादयाचना

**श्री. वसंत वामन प्रधान**
श्री गणाधीराज को. ऑ. हाऊसिंग सोसायटी लि.
बि. नं. २, ब्लॉक नं. १२, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व)
मुंबई – ४०००८१.

मन एव मनुष्याणां कारणम बंध मोक्षयो. जीवात्मा अर्थशून्य जीवन जगतो आहे. (अध्यात्मिक) कधीमधी मनाला जाग येते आणि हे सारे संपावेसे वाटते. तेच ते बंदिस्त यांत्रिक जीवन, जें सारे आयुष्यभर जगला, मुक्त जीवनाचे

संकल्प मावळले साऱ्या दिशा अंधारल्या. शेवटी संचीत म्हणून आहेच. जीवनाचा ध्येयवाद पूर्ण झाला नाहीं तर जीवनाची अपूर्णता जाणवते. मनातील खरखर अंतर्मनाचा शोध घेते. स्वप्न सृष्टीचे देखावे अल्पकाळ मनाला संतोष देतात परंतु वास्तवांत परत तडफड सुरू होते. असे हे अतृप्त मन वासनांचे गाठोडे घेवून केव्हांतरी आत्म्याबरोबर प्रयाण करते ते परत वासना तृप्ती करता नवीन देहात प्रवेशते. असा हा वासना तृप्ती करता चाललेला जीवात्म्याचा अट्टाहास थांबत नाही व पुन्हां पुन्हां संचिताचे गाठोडे घेवून प्रवास सुरू होतो. जीव दमतो अगतिक होतो व सुटकेचा मार्ग शोधू लागतो. दैववशात जीवात्म्याला प्रकाश किरण दिसला तर जीवनाची सारी दिशा बदलते व तो लोहचुंबका-प्रमाणे प्रकाशाकडे धाव घेतो. हा प्रकाश किरण म्हणजेच सद्‌गुरुची कृपा. ह्या प्रकाशाने न्हाऊन निघण्याचे भाग्य ज्याना लाभले ते अंती सद्‌गुरुसी एकरूप झाले. तेथे जीवन संपले, नदी सागराला मिळाली, आत्मा परमात्म्यात विलिन झाला बंदिस्त जीवनाचे दास्यत्व सुटले, मुक्त जीवनाचे स्वातंत्र्य मिळाले परंतु आता त्याचा उपयोग नाहीं. कारण जीवनाची विस्मृती झाली. अशा जीवन मुक्त अवस्थेत जे जगले त्यांचे आदर्श आपल्यापुढे ठेवू या. श्रीसाईबाबांचे एक-निष्ठ भक्त म्हाळसापती, श्री उपासनी महाराज, जोग, माधवराव देशपांडे, (शामा) श्री दासगणू महाराज असे अनेक ज्ञात व अज्ञात भक्त संसारातसुद्धा विरक्त जीवन जगलेल्यांचे स्मरण सुद्धा आपले जीवन चैतन्यमय करीत मी एक सामान्य साईभक्त अध्यात्म्याचे काही ज्ञान नसणारा केवळ साईकृपेवर जीवन जगणारा माझी जीवन नौका श्रीसाईबाबा पैल तीरी नेतील अशी खात्री आहे. गुरुपौर्णिमेला श्रीबाबांचे स्मरण करतांना माझी तळमळीची विनंति आहे की बाबा वासनांचा परित्याग होईल अशी माझी मनाची धारणा दृढ करा. माझ्या मनाचे घोडे जे सैरावैरा धावत आहेत त्यांचे तुम्ही सारथ्य करा व लगाम घट्ट धरून आजपर्यंतचे वासनांचे गाठोडे तुमच्या चरणाजवळ ठेवून घ्या. मी व माझे साईकुटुंबिय बंधुभगिनी तुमच्या कृपेने सुखाने संसार करून अखंड साईचिंतनात रहावे यापेक्षा दुसरे सुख कसले! संसारी जीवनांत :- बाह्यात्कारे बंदिवास अंतरी साईसी दृढसहवास" अशी अवस्था असावी.

卐

# श्रीसाई सद्गुरु महिमा

–सौ. उषाताई अधिकारी
सावित्री सदन, बंदर रोड, रत्नागिरी.

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णू गुरुर्देवो महेश्वरः ॥
गुरुः साक्षात्परब्रम्ह तस्मै श्रीगुरवे नमः ॥

गुरु म्हणजे प्रत्यक्ष परमात्माच. दोन्ही अभेद आहेत. परमेश्वराने सुद्धा गुरुचे महात्म्य कबूल केले असून प्रत्यक्ष परमात्म्याने सुद्धा गुरु केला आहे. "कृष्ण परब्रम्हाचे रूपडे, फोडी लाकडे सांदिपनीकडे" । विष्णूने आठव्या अवतारात सांदिपनीकडे लाकडे तोडली. गुर्वाज्ञा पाळली, पडेल ते काम केले. प्रत्यक्ष परब्रम्ह आपलेकडे राबराब राबले. हे कळताच सांदिपनींना फार वाईट वाटले परंतु श्रीकृष्णाने त्यांची समजूत घातली. कंसाचे रक्षक कृष्णाला शोधायला येताच स्वतःच्या मुलाला कृष्ण म्हणून त्याचे ताब्यात देऊन टाकले. गुरुचे हे आपल्यावरचे प्रेम कृष्ण विसरला नाहीं. मृत्युच्या कराल दाढेत गेलेला सांदिपनीचा कौशिक त्याने परत आणून दिला. आणि आपली गुरुभक्ती शिखराला चढविली. प्रभू रामचंद्रालाही वसिष्ठ ऋषींना गुरु करावे लागले. दत्तगुरुचे गुरु अत्रि ऋषी. शिवाय त्यानें २४ शिक्षा गुरु केले. ध्रुवाने नारदांना गुरु केले. व अक्षयपद मिळविले. वाल्याने नारदांनाच गुरु करून वाल्मीकी ऋषी म्हणून नाव मिळविले. धौम्य ऋषींच्या आरुणीने स्वतःचा देह बांधावर आडवा घालून पाण्याचा लोंट थांबवला. केवळ गुर्वाज्ञा पाळण्यासाठी उपमन्यु आंधळा झाला. विहिरीतही पडला पण त्याची तीव्र गुरुनिष्ठा पाहून सद्गुरुंनी त्याला बाहेर काढून त्याचे रक्षण केले. गुरु कसा असावा याचे थोडक्यात मार्मिक विवेचन दासगणूंनी श्रीगजानन विजय ग्रंथात केले आहे ते असे –

गुरु असावा महाज्ञानी । चातुर्य शास्त्र चिंतामणी ।
गुरु असावा परमगुणी । विघ्नगाते संहारिता ॥
गुरुच पिता, गुरुच माता, गुरुच मोक्षदाता । गुरु आहे सर्वकाही ॥

या वर्णनाला पात्र असलेले आपले सद्गुरु, आपले परमदैवत म्हणजे श्रीबाबा. ज्यांचे नुसते नाव उच्चारले, मूर्ती पाहिली की अंगावर रोमांच

उठावेत, कंठ दाटून यावा, डोळ्यांना अश्रूधारा लागाव्यात असे! आपले दैव थोर म्हणूनच बाबांसारखे रत्न आपल्याला लाभले. आपणाला त्यांच्या नुसत्या दर्शनाने इतका आनंद होतो, समाधान लाभते, शांती मिळते, मग त्यांच्या प्रत्यक्ष सहवासात राहिलेल्या माणसांची स्थिती काय वर्णावी? पण प्रत्यक्ष सहवास मिळालेल्या भक्तांची पण बाबांनी विलक्षण परीक्षा घेतली आहे. दादा केळकरांना एकादशीच्या दिवशी कोऱ्हाळ्यास स्वतः जाऊन सागुती आणण्याची आज्ञा केली. दादा कर्मठ ब्राम्हण पण गुरुपदी अनन्य निष्ठा. वार्धक्याने देह विकल झाला असताही ते गुर्वाज्ञा पालनासाठी सागुती आणायला निघाले. श्रीबाबांनी त्यांची पात्रता ओळखून त्यांना जाण्यास मनाई केली. जी गोष्ट दादांची तीच काका दीक्षितांची. उच्च शिक्षित, श्रीमंत, उच्चवर्णीय ब्राम्हण कुळात जन्मलेल्या काकांना तर आसन्नमरण बोकडाला मारण्याची आज्ञा केली. काकांनी खरोखरच सुऱ्याचा वार करण्यासाठी हात वर्तुळाकार फिरवला. तेव्हां बाबा म्हणाले, "काका, तू ब्राम्हण असून किती निष्ठूर आहेस रे? शाबास तुझी. तू हिंसा करायला कसा धजावलास? काकांनी नम्रपणे म्हटले की परीणामांची पर्वा आम्ही कशाला करायची? इष्टानिष्ट मला कळत नाहीं. कळते ते गुरुच्या आज्ञेचे पालन आपल्या शब्दाइतके जपण्यासारखे अन्य काय आहे या जगात? आपली आज्ञा, मग ती कसलीही असो. त्याचे पालन करणे हेच एकमेव सर्वश्रेष्ठ कर्तव्य मी समजतो. श्री बाबा हसले. बोकडाचे मरण काकांचे हातून चुकले आणि त्यांची भक्ती कळसाला पोचली. भीमाजी पाटील कफक्षयी. तापाने बेजार. पण गुर्वाज्ञेचे पालन म्हणून ओल्या जमिनीवर सतत वावरले. झोपले आणि त्याचे बक्षिस म्हणून श्रीबाबांनी त्यांना त्या भयंकर रोगातून मुक्त केले. तो अमीर शक्कर वातविकाराने आजारी झाला असता त्यालाहि चावडीत रहायला सांगितले होते. ती पण जीर्ण, सरडे, पाली, विंचू यांचे आगर असलेली. अमीर शक्कर कंटाळून एका रात्री पळाला. त्याचेवर इतका भयंकर प्रसंग ओढवला की, कोपरगावाहून तो 'बाबा बाबा' ओरडत परत चावडीत आला. गुर्वाज्ञा पाळली नाही तर अशी संकटे येतात, हे त्याला पटले 'तात्या पाटलानेही' दोनवेळा आज्ञाभंग केला तेव्हां त्यांना अपघातात सापडावे लागले. पण, बेऱ्यांनी आज्ञा पाळताच त्यांना चोरांपासून अभय मिळाले. 'नोकरी सोड' असे पुन्हां पुन्हां सांगत असताही दासगणूंनी आज्ञा मोडली. त्याचे प्रायश्चित्त त्यांनाही भोगावे लागले. अखेर ते बाबांना शरण आले. व त्यांनी नोकरी सोडली. बाबांनी त्यांना अभय देऊन आपल्या श्रेष्ठ भक्तात उच्च पदाला बसवून त्यांच्याकडून संतचरित्रे लिहवून घेतली. श्रीबाबा जितके

रागीट तितकेच करुणाधन होते. भक्तांना वळण लावण्यासाठीच ते त्यांची परीक्षा घेत. वेळेनुसार शिक्षाही करीत. पण त्यांचे इतके भले करीत की त्या माणसाने काय समजायचे ते समजावे. श्रीबाबांची पंचमहाभूतांवर पण सत्ता होती. ही सत्ता फक्त परमेश्वराच्या आधीन आहे. पण बाबा हे परमेश्वर स्वरूपच असल्याने त्यांना वादळ शमवता आले, अग्नी शांत करता आला. जी स्थिती पंचमहाभूतांची तीच निर्जीव गोष्टींची. सापाच्या भयंकर विषाला त्यांनी वर चढू दिले नाही. प्लेगच्या गाठी स्वतःच्या अंगावर घेतल्या. इतकेच नव्हे तर भक्तांची अनेक संकटे स्वतःवर घेतली. स्पर्शाने रोग बरे केले, उदीने बरे केले. परमप्रिय तात्याबा हा आपला शिष्य नव्हे तर पोटचा पोरगा मानून त्याच्या मृत्युच्या बदल्यात स्वतःचा प्राण अर्पण केला. याहून गुरुची थोरवी ती काय वर्णावी?

सद्गुरु साई माऊली आज प्रत्यक्षात नाहीं. डोळ्यांना दिसत नाहीं. नाही दिसली म्हणून काय झालं? अदृश्य रूपाने ती भक्तांना संकटांची सूचना देत आहे. त्यांचे रक्षण करत आहे. व्याधिमुक्त करीत आहे. दिलेले वचन पाळीत आहे. कृपेचा वर्षाव करीत आहे. याहून दुसरे आपणाला काय हवे! जन्मास यावे आणि साईसारखाच सद्गुरु लाभावा.

परात्पर सद्गुरु साई
त्यासारखा कुणी झाला नाहीं ।

पुष्कळसे गुरु आपल्या गुरुपदाचे स्तोम माजवतात. मी तुमचा गुरु आहे. असे श्रीबाबांनी कधीच भासवले नाहीं. मी अल्लाचा बंदा गुलाम आहे, तुमच्या विष्ठेपोटीचा कीडा आहे इतके कमीपण स्वतःकडे घेतले. पण परब्रम्हाचे तेज आणि ओढा लपून थोडेच रहाणार? मुळचे शास्त्रांसारखे कर्मठ, सोवळ्या ब्राम्हणाला घोलप स्वामींच्या (त्यांच्या गुरुच्या) रूपात दर्शन दिले तर पंडित डॉक्टरांना त्यांचे गुरु काका पुराणिक यांचे रूपात दर्शन देऊन स्वतःला गंध लावून घेतले.

एक दिवस ते तात्या नूलकरांना म्हणाले, "म्हाताऱ्या, या खांबाची पूजा कर. नम्रपणे तात्या होय म्हणाले. धावत पळत पूजेची तयारी करू लागले. ते पाहून बाबा म्हणाले, शामा, तो एकटाच काय पूजा करतो? तू पण कर. शामराव म्हणाले मी मुळीच या खांबाची पूजा करणार नाहीं. तुमची करीन."

बाबा ऐकेनात. श्यामराव हट्ट सोडीनात. शेवटी दादा केळकरांनी पंचांग पाहिले तो व्यासपौर्णिमेचा – गुरुपौर्णिमेचा दिवस होता. सर्वांना आनंद झाला. तात्याबा पाटलांना शेतावरून बोलावून आणले. श्रीबाबांसाठी नवीन वस्त्रे आणवली सर्वांनी मनोभावाने श्रीबाबांची पूजा केली. तरी स्वतःकडे मोठेपणा न घेता बाबा म्हणाले लेकरांचा हट्ट आहे ना? होऊ द्या त्यांच्या मनासारखे. असे होते श्रीबाबा खरे भक्तवत्सल – खरे गुरु. त्या दिवसापासून शिरडीत दरसाल गुरुपौर्णिमेचा उत्सव धूम धडाक्यात होत आहे. मुंगीसारखी माणसे पाऊसपाण्याची पर्वा न करता मुलांलेकरांना घेऊन धावत आहेत. उत्सवाचा आनंद भोगीत आहेत. समाधान पावून परतत आहेत. मलाहि वाटते जावे असे! पण मी पडले अबला. जायला जमत नाही. पण माझे मन विचलित होत नाही. माझा दयाघन गुरु श्रीसाईहरी माझ्या हृदय मंदिरात केव्हांच विराजमान झालेला आहे त्याच्या छबीचीच मी मनोभावे पूजा करते. माझ्या घरीच माझी पूजा मान्य होतेय. आशीर्वाद मिळतोय आणखी काय मागायचे? काय मिळवायचे?

मी एवढेच म्हणते –

श्री सद्‌गुरु बाबा साई
अखंड सौभाग्य मज देई
नित्य अनुसंधान राही
अशीच बुद्धि मज देई ॥

श्रीसाई सद्‌गुरु चरणांशी पुन्हां पुन्हां नमस्कार ओम तत् सत् ।

# जैसे मूळसिंचने महजे ।
# शाखापल्लव संतोषती ॥

– र. श्री. पुजारी.
रमा निवास, ९९२ सदाशिव पेठ, पुणे ३०.

श्रीसाईसारख्या जागृत दैवताची भक्ती आपण इतकी करीत असतानाही शिरडीस गेल्यानंतर आपले चित्र श्रीचरणी हळूवार, व्याकूळ का होत नाहीं? मनाचे पाषाणपण का मोडत नाहीं बरे? या प्रश्नाचे उत्तर सरळ आहे. विहीर पाताळापर्यंत खणल्याशिवाय तिला जिवंत पाणी कसे लागेल? श्रीगुरुंवर दीर्घकाळ प्रेम केल्याशिवाय, त्यांची सेवा केल्याशिवाय, त्यांच्या चरणी अनन्य झाल्याशिवाय भक्तीचा उमाळा मनात कसा निर्माण होईल? प्रेमाची मुळे अंतःकरणाच्या तळापर्यंत पोचतील तेव्हांच हे सर्व शक्य होणार. अन्यथा आपली भक्ती विहिरीत वरून ओतलेले पाणी किंवा बागेतील फुलझाडांना वरून चिकटविलेली रंगीबेरंगी फुलेच ठरणार!

बागेतील फुलझाडांना पाणी घालणारा माळी आपली पाण्याने भरलेली झारी त्यांच्यावर धरीत असतो. पण त्याचे सर्व लक्ष आपण घातलेले पाणी त्या फुलझाडांच्या मुळांशी पोचते की नाहीं इकडे असते.

पाणी फुलझाडांच्या मुळांशी पोचावे म्हणून झारीची धार प्रामुख्याने तो मुळांच्या दिशेनेच धरतो. खतही मुळांशीच घालतो. मुळांशी उगवलेले तण काढून, तेथील माती भुसभुशीत करून तिच्यात एक आळेही तो करतो. यामुळे मुळांना शेवटपर्यंत पाणी पोचून शाखापल्लव संतोष पावतात. सेवा करणारास इष्ट ती फुले–फळे यथाकाल आनंदाने प्रदान करतात.

भक्तीचे बाह्यस्वरूप या रसरशीत फुलापानांप्रमाणे असते. अंतःस्वरूप मात्र स्वतःस जमिनीत खोलवर गाडून घेणाऱ्या आणि तेथून वरील फुलापानांना अखंड जीवनरस पुरविणाऱ्या मुळांप्रमाणे असते.

धूप–दीप–आरती, गायन–वादन, शांतता यामुळे मंदिरात नेहमीहून एक निराळे वातावरण तयार होते. ते वातावरण सात्त्विक मनाना भुरळ घालते.

उन्हाळयात वाळयाच्या पंख्याचे जे स्थान, ते या वातावरणास लाभते. मन क्षणभर सुखावते. याचा अर्थ त्या दैवताविषयी मनात भक्तीचा उदय झाला असे नाही. तो उदय होण्यास काही पार्श्वभूमी असावी लागते. ती पार्श्वभूमी घरीदारी, समाजात लहानपणापासून तयार होत असते. जमिनीत खोलवर पसरलेली झाडाची मुळे मातीमधून जीवनरस शोषून घेतात त्याप्रमाणे भक्तीचे पोषण मनात हळूहळू चालू असते.

मूर्ती दिसो वा न दिसो, मंदिर दिसताच थांबून हात जोडणे हा भारतीय मनाचा भक्तिसंस्कार एका जन्माचा नव्हे. अनंत जन्मांची ही उपासना होय. असा भक्त मंदिरातील मूर्तीसमोर उभा राहाताच त्याच्या डोळयांना प्रेमाश्रूंच्या धारा लागतात. त्या पाहून पाषाणमूर्तीत असलेल्या देवाचे मनही आनंदाने गहिवरते. असा भक्त ते स्थान सोडून दूर कोठे निघाला तर विरहाने मूर्तीच्या डोळयांना धारा लागतात. देव आणि भक्त यांच्या प्रेमाचा हा अपूर्व गोड आविष्कार पाहाताना ख्याली येते की हे नाते या जन्मीचे नाही. जन्मजन्मांतरीचे आहे.

देव मूर्तीरूपाने मंदिरात असला तरी प्रत्यक्षात त्याची चरणकमले कोठे विसावतात बरे? या प्रश्नाचे उत्तरही संतांनी दिले आहे. देवाचे चरण आपल्या घरात, नोकरीधंद्याच्या ठिकाणी, रस्त्यात, फार काय वाबत्या वहानातही विसावतात. तेथे आपण त्यांच्याशी कसे वागलो यावरच आपल्या भक्तीचा वेल-विस्तार शाखापल्लव किंवा फुले—फळे अवलंबून असतात.

ज्याला आपण पूर्णपणे जाणले, जो आपल्या जिवाचा जिवलग झाला, अर्जुनाप्रमाणे सखा आणि श्रीकृष्णाप्रमाणे गुरु झाला त्याच्या प्रेमभेटीचा आनंद काय वर्णावा! पण असे नाते दुर्मिळ. मनाच्या मुळाशी अखंड प्रेमसिंचन केल्या-विना असे नाते निर्माण होणेही अशक्य.

★

# सद्गुरु महिमा अगाधचि

ह. भ. प. **श्री. चिंतामण लक्ष्मण शित्रे.**
शित्रे सदन, १० वा रस्ता चेंबूर, मुंबई ७१.

आटपाट नगर होते, तेथे दामोदर रंगनाथ नावांचे एक सधन सद्गृहस्थ सदाचार संपन्न, लहानसे कुटुंब असलेले, सदासुखी, सदा आनंदी, देशस्थ यजुर्वेदी ब्राम्हण, देगांवकर हे ज्यांचे उपनाव अशा रितीने आपल्या कुटुंबासह वर्तमान आपल्या आयुष्याचा काळ मागे टाकीत होते.

कोणी गृहस्थ होते, दामोदर रंगनाथ नावाचे ॥
देगांवकर जयाचे होते उपनाव आयकासाचे ॥१॥

त्यांना मालती नावाची एक सुकन्या होती. ती 'परम साईभक्त' होती. आपल्या भक्ताची परिक्षा पहावी असे बाबांना वाटले की काय? कोण जाणे? आणि त्यांची ती कन्या तापाने फारच आजारी झाली.

तत् कन्या ज्वर पीडीत होती बहु दिवस मालतीबाई ॥
उपचार बहुत केले, परंतु गुण येईना असे होई ॥२॥

ताप फार वाढला पण गुण नाहीं सर्व तऱ्हेचे उपचार झाले, डॉक्टर, वैद्य, हकीम, गंडे, धागे, दोरे ज्योतिषी रथी महारथी सर्व पालथे घातले पण काहींही उपयोग झाला नाहीं. आता काय करावे म्हणून डोळ्यासमोर प्रश्न उभा राहिला दुःखे अनिवार होऊ लागले. ती शुद्धितही नव्हती. पण तिच्या मनात साई-बाबांचे नाम स्मरण चालू होते. तोंडाने ती काही तरी पुटपुटत होती. अशा परिस्थितीत ती सांगत होती की मला बाबांकडे घेऊन चला. तेथे मी बरी होईन. पण सर्वांचा तेवढा विश्वास श्रद्धा नसल्याने कोणी घेऊन जाण्यास तयार होईना! शेवटी तिची शेवटची इच्छा समजून किंवा काय तिला कशीबशी डोली करून शिर्डीला आणली आणि बाबान् जवळ ठेवली.

पुष्कळ शिव्याही देऊनी टाका बाईस कांबळ्यावरती ॥
अंत्य विधिची तेव्हां लोक तयारी करावयास जमती ॥३॥

बाबा म्हणतात. हे मढे येथे कशाला आणलेत. घेऊन चला.

ती कन्या मृत झाली, ऐसे सर्वांस वाटले चित्ति ॥
पाणी टंब्रेलातील पाजा हो साईजी असे म्हणती ॥४॥

बाबांच्या म्हणण्या प्रमाणे तिला शेजारीच पडलेल्या टंब्रेलातील पाणी पाजले मात्र तो काय चमत्कार । तिने डोळे किलकिले केले थोडी फार उघड झाप डोळ्याची सुरु झाली व ती हळू हळू बोलावयासही लागली.

कोणी एक भयंकर पुरुष मज, घेऊनि जात असताना ॥
मी हाक मारली हो सोडविण्यास मजसी आज बाबांना ॥५॥

कोणी एक काळा पुरुष मला घेऊन जात होता. डोळे त्याचे खंदीरांगा-माराचे उग्र अशा तऱ्हेचा तो पुरुष मला नेत असावा असे ती सांगत होती.

बाबांनी मग येउनी मार दिला त्यासी मजसी सोडविले ॥
रक्षु निज भक्ताला भूवन त्रयी जगी यशासी वाढविले ॥६॥

मला तेथे बाबा दिसले बाबा त्या पुरुषाला मारताहेत असे मी पाहिले. दोघांच्या झटापटीतून बाबांनी मला सोडविले हे खरे! आणि सांगायला कारण भक्त रक्षण करुन, बाबांनी आपले ब्रीद राखले व 'सद्‌गुरु महिमा अगाधचि' याची साक्ष लोकांना पटली हेच खरे जगाला प्रचिती दाखवून दिली. श्रद्धा, भक्ती, विश्वास निस्सीम प्रेम या गोष्टी असल्या तर काय होणार नाही.

ऐसा सद्‌गुरु महिमा किती किती वर्णु कळेना मन्मतीला ॥
सेवा घडो तयाची वंशो वंशी अशीच विनंती तुम्हां ॥७॥

यावरुन सद्‌गुरु महिमा किती वर्णन करावा हे माझ्या अल्पबुद्धिला न कळे हे खरे.

काय वर्णु आता न पुरे ही वाणी ॥ मस्तक चरणी ठेवितसे ॥
आपुली या वळे नाही बोलवत । सखाकृपावंत वाचा त्याची ॥८॥

सारांश मालतीबाईंची बाबांवर अपार श्रद्धा, प्रेम, विश्वास होता म्हणून तिने बाबांना आपलेसे केले. व ती या भवसागरातून हा हा म्हणता तरुन गेली. तसे तुम्ही आम्ही तरुन जावे असे वाटत असेल तर बाबांना आपलेसे करा. आजही ते आपल्या जवळ आहेत याची प्रचिती म्हणजे मग तुम्हांलाही आल्या शिवाय रहाणार नाही.

# साई दरबारातील काही मानकरी व त्यांनी केलेली सेवा

| | |
|---|---|
| १) दासगणू | — किर्तन व प्रवचनाद्वारे बाबांच्या लीलांचा प्रचार केला. |
| २) आण्णासाहेब दाभोलकर | — श्रीसाईसच्चरित हा प्रासादिक ग्रंथ लिहून साईभक्तांवर अनंत उपकार केले. |
| ३) काकासाहेब दीक्षित | — शिरडीला वाडा बांधून भक्तांची रहाण्याची सोय केली. |
| ४) अब्दुल्ला | — द्वारकामाईत रोज पणत्या लावण्याचे काम करी. |
| ५) काशिराम शिंपी | — बाबांचे कपडे शिवित असे. |
| ६) राधाकृष्णाआई | — बाबांच्या येण्या–जाण्याचा रस्ता नेहमी स्वच्छ ठेवित असे. |
| ७) भागोजी शिंदे | — रोज बाबांचे अंगमर्दन करीत असे. |
| ८) गोपाळराव बुटी | — त्यांच्या वाड्यात बाबांचा देह विसावला आहे. व रोज असंख्य भक्त तेथे पूजा अर्चा करीत आहेत. |
| ९) शामा | — बाबांचे दर्शनास आलेल्या प्रत्येक भक्ताची शामा प्रथम बाबांशी ओळख करून देत असे. तसेच बाबांना आलेली पत्रे वाचून दाखवित असे. |
| १०) बायजाबाई | — बाबांना नित्य नेमाने भाकर करून देत असे. |

—श्री. माधव गजानन गोरे.
विनायक बाग, बालाजी मंदिर मार्ग,
कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०००७०.

# गुरुपौर्णिमा आणि माझी सत्यनारायणाची पूजा

—श्री. तुकाराम एस्. कदम.
शिंदे चाळ, रूम नं. ४, गौरीशंकर वाडी, जवाहर रोड,
पंतनगर, मुंबई ७५ (पूर्व)

वर्षातून एकदाच गुरुपौर्णिमा येते. त्या गुरुपौर्णिमेला मी असा एक निश्चय केला, तो असा की, मी साईबाबांचे "साई-सच्चरित" याचे वाचन करीत होतो, आणि त्या अध्यायाचा शेवटचा दिवस रविवार होता. आणि असाच त्या दिवशी पुष्कळ पाऊस पडत होता. मला असे वाटत होते की, हा पाऊस कधीच थांबणार नाहीं. आणि दुसऱ्या दिवशी सोमवार होता. तो दिवससुद्धा पावसाचा होता. मी मनांत सोमवारच्या सकाळी नेहमीप्रमाणे पुजेच्यावेळी बाबांच्या प्रतिमेसमोर उभा राहून मनांतच म्हटले की बाबा, आपले हे साईसच्चरित्राचे वाचन मी संपविले आहे. आणि माझ्या मनांत आपल्या गुरुपौर्णिमेच्या दिवशी श्रीसत्यनारायणाची पूजा करण्याचे योजिले आहे. तेव्हां आपली व श्रीसत्य-नारायणाची पूजा करीत असतांना जर कां असाच पाऊस पडत असला तर? माझे गुरुबंधू व नातेवाईक आपल्या पूजेला कसे येतील? आणि आपल्या पूजेची शोभा कशी काय वाढेल. हे माझ्या अंतर्मनानें मी बाबांच्या प्रतिमेसमोर म्हटले. आणि खरोखरच बाबांनी माझ्या अंतर्मनाची ही हाक ऐकली आणि काय आश्चर्याची गोष्ट म्हणजे मंगळवारी गुरुपौर्णिमा व माझी श्रीसत्यनारायणाची पूजा होती त्या दिवसापासून जो पाऊस बंद झाला तो कायम चार दिवसपर्यंत पडलाच नाहीं. अशी ही बाबांची अगाध लीला आहे. सांगायचे तात्पर्य म्हणजे काय असे कितीतरी लहानमोठे साईबाबांचे अनुभव माझ्या मनाला साक्षात आलेले आहेत. आणि पुढे येणारसुद्धा आहेत. कारण बाबांनी असे म्हटले आहे की, "जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव". हे अगदी खरोखरच साक्षात ब्रह्मवाक्य आहे. आणि हे मी सर्व बाबांची प्रतिमा माझ्या डोळ्यासमोर उभी करून सांगितले बाबा हा माझा एक अनुभव मी साईलीला अंकामध्ये प्रसिद्ध करीन. त्याप्रमाणे मी हा माझा अनुभव साईलीला अंकासाठी प्रसिद्ध करीत आहे. आणि खरोखरच मी माझे गुरु व माझे बाबा यांना कदापि विसरणार नाहीं. आणि अशी ही गुरुपौर्णिमा आणि माझी श्रीसत्यनारायणाची पूजा बाबांच्या कृपेने पार पडली.

# साईभक्त श्री काकासाहेब दीक्षित

श्री. हरी सीताराम उर्फ काकासाहेब दीक्षित हे श्रीसाईबाबांचे एक निस्सीम भक्त होते. त्यांनी आपल्या उतार वयात बाबांचे शिष्यत्व पत्करून आपली आध्यात्मिक उन्नती करून घेतली होती.

श्री. काकासाहेबांचा जन्म इ. स. १८६४ मधे खांडवा येथे वडनगरा नागर ब्राम्हण कुळात झाला होता. काकांचे वडीलबंधू रावबहादूर राजाराम सीताराम दीक्षित हे नागपूरातील एक नामांकित नागरिक होते. ते कर्तबगार कंत्राटदार होते व त्यांनी मिळविलेल्या लौकिकामुळे सरकारने त्यांना 'रावबहादूर' ही बहुमानाची पदवी दिली होती. ते ऑनररी मॅजिस्ट्रेट होते. त्यांचे दोन्ही पुत्र मोतीभाऊ व मोरूभाऊ बॅरिस्टर होते. पण ते दोघेही अकाली मरण पावले. काकासाहेबांचे धाकटे बंधू सदाशिवराव हे बी. ए. एल्. एल्. बी. होते. ते वाच्छ संस्थानचे दिवाण होते.

काकासाहेब दीक्षितांचे प्राथमिक व दुय्यम शिक्षण खांडवा, हिंगणघाट व नागपूर येथे झाले. इ. सन १८७८ म्हणजे वयाच्या चौदाव्या वर्षी ते नागपूरच्या सिटी हायस्कूलमधून मॅट्रिक्युलेशन परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले व त्यांनी दोन शिष्यवृत्त्या मिळविल्या. नंतर मुंबईच्या विल्सन महाविद्यालयातून पी. इ. पास झाल्यावर ते एल्फिस्टन महाविद्यालयात गेले व तेथून एकोणीसाव्या वर्षी बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले, व त्यांनी धीरजलाल मथुरादास शिष्यवृत्ती मिळविली. नंतर एल्. एल्. बी. चा अभ्यास केला. सॉलिसिटरची परीक्षा त्यांनी दिली. काही दिवस गव्हर्नमेंट सॉलिसिटर्सतर्फे 'लिटल कंपनी'त काम केल्यावर यांनी आपली स्वतंत्र सॉलिसिटर्सची पेढी उघडली. त्यामुळे त्यांनी खांडवा, नागपूर सोडून मुंबईस विलेपार्ले येथे आपला कायम निवास केला. एक हुषार नामांकित सॉलिसिटर म्हणून इंग्रजकाळात ते प्रसिद्धीला आले. काकासाहेब हे नागर ब्राम्हणातले पहिले सॉलिसिटर होत. महाराष्ट्रात ब्राम्हणांत पहिले सॉलिसिटर म्हणून रावबहादूर धोंडो शामराव गरुड यांचे नाव त्यावेळी घेतले जात असे. भावनगर एक्सपोझर्स, पुणे वैभववरील राजद्रोहाचा खटला, लो. टिळक व ग्लोव, लो. टिळक व टाईम्स ऑफ इंडिया, जी. आय. पी. (सेन्ट्रल रेल्वे) रेल्वेच्या सिग्नलर्स लोकांनी केलेला संप

इत्यादींचे महत्त्वाचे खटले काकासाहेबांनीच चालविले, त्यामुळे त्यांचे नाव खूपच गाजले. पुढे काकांनी सार्वजनिक कार्यातही पडण्याचे ठरविले १८९६ साली गिरगाव वॉर्डतर्फे ते मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या निवडणुकीस उभे राहिले व यशस्वीपणे निवडून आले. तत्कालीन पालिकेच्या कितीतरी समित्यांवर त्यांची नेमणूक करण्यात आलेली होती. कॉर्पोरेशनमध्येही त्यांनी चांगला लौकिक मिळविला. काकांची कर्तबगारी, काम करण्याची हातोटी व सचोटी, निरलसता, स्पष्टवक्तेपणा इ. गुण त्यावेळचे भारताचे सिंह नामदार सर फेरोजशहा मेथा यांना दिसून आली आणि म्हणूनच की काय, त्यांनी काकांना आपल्या अनुयायात सहभागी करून घेतले. नेमस्त राजकारण काका फेरोजशहांपासून शिकले. मुंबई विद्यापीठाचे ते फेलो होते. तसेच दि इंडियन नॅशनल काँग्रेसचे (राष्ट्रीय सभा) ते एक महत्त्वाचे घटक होते. तसेच मुंबई सरकारी कौन्सिलचे सभासद होऊन नामदार दीक्षित या नावाने ते खूप प्रसिद्धिस आले. पुढे परमार्थाकडे त्यांचे मन वळले नसते, तर काकासाहेब आणखीन खूप पुढे गेले असते. गृहस्थाश्रमात त्यांनी चारीधाम यात्रा केल्या, व १९०६ साली विलायतेची पण सफर केली. श्रीसाईनाथ महाराजांशी त्यांचा निकट संबंध आला व त्यांच्या चरणी रमले, ते कायमचेच. शिरडीस ते वानप्रस्थ झाले. बाबांच्या आज्ञेप्रमाणे काका दर दिवशी सकाळी एकनाथी भागवत वाचत असत व रात्री भावार्थ रामायण नित्य नेमाने वाचत. साईनाथांच्या बरोबरचा त्यांचा सहवास असलेली काकांची रोजनिशी प्रसिद्ध आहे. काकासाहेबांच्या पत्नीचे नाव सरस्वतीबाई. त्या काकांच्या अगोदर निवर्तल्या. काकांना रामकृष्ण व बाळकृष्ण असे दोन पुत्र व एक कन्या एवढी अपत्य संपदा होती. शिरडी संस्थानचे काका एका काळी चिटणीसपदावर होते. शिरडी संस्थान स्थापन झाल्यापासून ते चिटणीस होते. ज्येष्ठ वद्य एकादशी शके १८४८ म्हणजेच ५ जुलै १९२६ रोजी विलेपार्ले ते चर्नीरोड असा आगगाडीतून प्रवास करीत असतांना गाडीतल्या गाडीतच लोअर परळ स्टेशनवर त्यांची हृदयक्रिया बंद पडली व त्यांचे देहावसान झाले. निधन समयी त्यांचे वय ६२ वर्षांचे होते. मृत्युच्या दिवशी प्रवास करीत असताना त्यांचेबरोबर श्री. गोविंद रघुनाथ दाभोलकर उर्फ आण्णासाहेब (हेमाडपंत) होते.

पूर्वी लंडन शहरी रेल्वेने प्रवास करीत असताना फलाटावर पडून श्री. दीक्षितांच्या पायास दुखापत झाली होती. सर्व देशी-विदेशी डॉक्टर, वैद्य, हकीम करूनही ती बरी होईना. जन्माचे हे एक दुखणे होऊन बसले. श्री.

दीक्षित पंगु झाले. परावलंबी होऊन पडले. तरी पुढारीपणाचा मुरलेला अहंकार त्यांना घरी स्वस्थ बसू देईना. एकदा निवडणुकीच्या निमित्ताने ते नगरला आले. शिरडीच्या जवळपासच्या परिसरात आले. मग मात्र त्यांना रहावेना. श्रीबाबांच्या दर्शनाची ओढ त्यांना लागली. हळूहळू ती तीव्र झाली. नेमक्या याच क्षणी काही निमित्य काढून श्रीबाबांनी श्यामास नगरला पाठविले. श्री. दीक्षितांना हात देऊन, गाडीत रात्रभर श्रीबाबांच्या लीलांच्या संकीर्तनात त्यांना रमवून सकाळी त्यांना शिरडीस आणले. हे सर्व करुणावात्सल्य श्रीबाबांचेच. कारण श्री बाबा पुढे एक दिवस म्हणाले,

"माझा भक्त कोठेही सातासमुद्रापलीकडे असो – चिमणीच्या पायाला दोरा घालून आणावे, तसा मी त्याला माझ्याकडे ओढून आणीन."

श्री. दीक्षितांना श्रीबाबांनी खरोखरच उंच हवेलीमधून बाहेर काढुन स्वतःकडे ओढून आणले.

पण यालाही काही विशेष कारण असले पाहिजे. अमुक जन्मजात, अमुक साधुपुरुषाशी तुझी भेट होईल आणि त्यानंतर जीवनमुक्तीचे द्वार तुला उघडेल, असा जणू त्यांना वर असावा, त्याप्रमाणे सर्व घडले.

श्री. दीक्षित म्हणजे भाविकतेची केवळ मूर्ती. श्रीबाबांच्या समोर एखाद्या निरागस बालकाप्रमाणे ते बसत. श्रीबाबांचा शब्द एखाद्या आज्ञाधारक मूलाप्रमाणे मानीत. जणू आजवर जे ग्रंथ त्यांनी उराशी बाळगले. त्यातील सर्व विचार ते विसरले, मन कोऱ्या पाटीप्रमाणे स्वच्छ पुसून श्रीबाबांकडे आले.

अज्ञ बालकाची ही विनम्र भूमिका श्री. दीक्षितांनी कधीही सोडली नाहीं. श्रीबाबांनीही त्यांना या लोभस भूमिकेमधून कधी बाहेर ओढले नाहीं. श्रीबाबा श्री. दीक्षितांना काका म्हणत. पण 'लंगडा' हे विशेषण घालूनच. श्री. दीक्षितांना ते कधी काका म्हणत 'बंड्या' या आवडत्या टोपण नावानेही ते दीक्षितांचा उल्लेख करीत. श्री. दीक्षितही स्वतःस "श्रीबाबांचे लाडके लेकरू" म्हणवीत. स्वतःची सही करतानाही हे बिरुद मोठ्या अभिमानाने मिरवित.

धन प्रतिष्ठा विद्वत्ता यावर श्री. दीक्षितांनी तुलसीपत्र ठेवले म्हणूनच श्रीबाबांचे ते इतके लाडके झाले. ज्ञान, भक्ती, वैराग्य यामुळे साईदरबारात नवरत्नांपैकी रत्न असे ते झळकले. पण त्याआधी त्यांनी जी लोकनिंदा सहन

केली तिला तोड नाहीं. समाजात कुचेष्टा होऊनही त्यांनी सद्‌गुरुंचे पाय सोडले नाहीत.

शिरडीस प्रथम आले तेव्हांच श्री. बाबांना ते म्हणाले

"सद्‌गुरो! या नश्वर देहाचे काय ! माझ्या मनाचे लंगडेपण घालवा."

श्रीबाबांनी श्री. दीक्षितांना अत्युच्चपदी बसविले. कळसास नेऊन पोचविले. पण त्या आधी श्रीबाबांनी त्यांना आपल्या गरजेनुसार घडविले. अनेक प्रसंगी त्यांची परीक्षाही पाहिली.

एकदा तर एकादशीच्या पवित्र दिवशी एका आजारी केवळ मरणोन्मुख बकरीची हत्या करण्याची आज्ञा त्यांना झाली. पण फुलाहूनही कोमल अंतःकरणाचे श्री. दीक्षित डगमगले नाहीत. सद्‌गुरुची आज्ञा मोडणे हेच पाप, या श्रद्धाभावनेने बकरीच्या मानेवर सुरी चालविण्यासही ते तयार झाले!

श्री. दीक्षित बाबांच्या आज्ञेनुसार नित्य श्रीएकनाथी भागवताचे आणि भावार्थ रामायणाचे वाचन करीत. हरिलीला श्रवणात आणि ध्यानधारणेत रंगून जात. तथापि आपल्या अंतःकाळी आपणास कोणते दुःख कर्मगतीप्रमाणे भोगावे लागेल या विचाराने ते कधी कधी अस्वस्थ होत.

अशा एका प्रसंगी श्रीबाबा अभय देऊन त्यांना म्हणाले,

"काका तुझ्या अंतकाळाची काळजी करतोस? मी तुला एखाद्या फुलाप्रमाणे विमानातून नेईन."

—आणि खरोखरच बोलता बोलता, हरिचिंतनी रंगता रंगता बसल्याजागी त्यांची प्राणज्योत शांत झाली. त्याचे असे झाले.

श्रीसद्‌गुरु साईबाबांच्या आज्ञेप्रमाणे काकासाहेब दररोज दिवसा एकनाथ भागवत व रात्रौ भावार्थ रामायण नियमाने वाचीत असत. दोन प्रहरी पाऊस थांबून उघाड पडली व मुंबईस डॉ. देशमुखांचे दवाखान्यांत जाण्याकरिता काकासाहेब निघाले. त्यांच्याबरोबर अण्णासाहेब दाभोलकर व काका तेंडुलकर ही मंडळी वांद्र्यास जाण्याकरिता निघाली. पार्ला स्टेशनवर १२-५९ ची गाडी थोडी उशीरा आल्यामुळे ते प्लॅटफॉर्मवर येऊन पोहोचताच ती त्यांना

मिळाली. गाडीत पाऊल टाकताच काकासाहेब महाराजांचे गुणानुवाद गाऊ लागले. ते म्हणाले, "पहा आण्णासाहेब, बाबा किती दयाळू आहेत. आपल्याला येता क्षणीच गाडी मिळवून दिली. एक मिनिटाचा सुद्धा खोळंबा केला नाही. पुढे गाडीत बसल्यावर खिशातून लहान टाईमटेबल काढून पाहून म्हणाले, पहा ही गाडी आपल्याकरिता लेट करून बाबांनी आपल्यास मिळवून दिली. नाहीं तर स्टेशनवर आपल्यास खोळंबावे लागते व हे केवळ महाराजांच्या कृपेनेच टळले. असे गुणानुवाद सुरू असता व डब्यात आण्णासाहेब व काकासाहेब हे समोरासमोर खिडकीजवळ बसलेले, गाडी पुढचे स्टेशन म्हणजे सांताक्रुझ याच्या आसपास आली व बोलता बोलता काकासाहेबांच्या शरीराचा तोल जाऊन त्यांना झोप येत आहे असे आण्णासाहेबांना आरंभी वाटले. म्हणून आण्णासाहेब उठून त्यांचे बाजूला बसून त्यांची मान सावरून झोपावयाचे आहे काय म्हणून विचारता तेव्हां उत्तर मिळाले नाहीं तेव्हां त्यांना मूर्च्छा आली असावी असे आण्णासाहेबांना वाटले व त्यांनी लगेच आपल्या उपरण्याची गुंडाळी करून त्यांच्या उशाला दिली, व त्यांना शुद्धीवर आणण्याकरिता पाणी पाहू लागले. डब्यात एकाजवळ भांडे मिळाले. इतक्यात गाडी सांताक्रूझ सुटून खार स्टेशनवर आली. तेथे आण्णासाहेब खाली उतरले व नळाचे पाणी मिळविले; पण इतक्यात गाडी सुरू झाल्यामुळे ते घाईघाईने डब्यात शिरले, व काकासाहेबांचे डोक्यावर व तोंडावर आणि डोळ्यावर खूप पाणी शिंपडले. तथापि शुद्धिवर आल्याचे काहींही चिन्ह जेव्हां दिसेना तेव्हां तेंडुलकर व आण्णासाहेब हे दोघेही फार अस्वस्थ झाले, व वांद्र्यास गाडी आल्यावर काकासाहेबास तेंडुलकरांचे हवाली करून झालेली हकिगत गार्डास सांगून काकासाहेबांस खाली उतरवण्याची तजवीज करावी म्हणून आण्णासाहेब डब्यातून खाली उतरून गार्डास कळविण्यास व त्याची मदत मागावयास बाहेर पडले. त्यावेळी पाऊस सोसाट्याने आल्यामुळे व पॅसेंजरची गर्दी असल्यामुळे गाडीचे डब्यांजवळ जाऊन पोचतात तों गाडी सुटली. मग तेथेच एका डब्यात शिरून गाडी जेव्हां माहिम स्टेशनवर उभी राहिली तेव्हां ते खाली उतरले व गार्डास सर्व हकीकत कळविली, व काकासाहेबांस तेथे बाहेर काढण्यास मदत मागितली. परंतु गार्डाने तेथे काहींच सोय नाहीं 'टेलीफोन' करून परळच्या स्टेशनावर 'स्ट्रेचर' माणसे व डॉक्टर मागविण्याची व्यवस्था करवितो व तेथे आपण त्यांना खाली घेऊ आणि तपासू असे गार्डाने सांगितले व गाडी तशीच पुढे गेली. आण्णासाहेबांचा समज काकासाहेबांना मूर्छना येऊन पडले आहेत व योग्य इलाजानंतर शुद्धिवर येतील असाच होता. गाडी परेलवर आली. व्यवस्थित-

रीतीने काकासाहेबांना डब्यातून बाहेर काढले. डॉक्टर हजर होतेच. त्यांनी काकासाहेबांना तपासून हृदयाची क्रिया बंद पडल्यामुळ, "त्यांचा प्राण कुडीतून निघून गेला" असा अभिप्राय दिला.

हरिभक्तांचे देहावसान हरिदिनीच घडवयाचे. जुने भक्त अप्पा कुलकर्णी आणि काशीराम शिंपी यांचे देहावसान एकादशीस घडले. श्रीबाबांचे देहावसानही ज्येष्ठ वद्य एकादशीस झाले.

त्या दिवशी शिरडीस दोन चमत्कार घडले. लेंडी बागेत श्रीबाबा ज्या लिंबाच्या झाडाखाली बसत. त्याची मधली एक मोठी फांदी अचानक मोडून पडली. दुसरी अशीच घटना म्हणजे द्वारकामाईवरील तीन कळसांपैकी एक कळस अचानक मोडून पडला.

श्री. दीक्षितांच्या देहावसनामुळे सर्वसाक्षी भक्तवत्सल श्रीबाबांनी केलेला हा शोकच होय.

५ जुलै ही काकासाहेब दिक्षितांची पुण्यतिथी व त्यानिमित्य या लेखाद्वारे त्यांना आदरांजली.



नको गाडी घोडा, नको पैसा अडका
शिरडी जायायला ग शिरडीला जायायला
नको लॉजिंग बोर्डिंग, पंचतारांकित
शिरडीला राहायायला ग शिरडीला राहायायला
साईमंदिर असताना कशाच ग फिकिर मला

—सादिक गिरकर
सिंधुदुर्ग किल्ला
मु. पो. मालवण
जि. सिंधुदुर्ग

# नांदा सौख्यभरे

## सुळे–कारखानीस शुभमंगल

अंबरनाथचे साईभक्त श्री. वासुदेवराव सुळे यांची कन्या चि. सौ. कां. हेमलता हिचा विवाह श्री. वसंत कारखानीस यांचेबरोबर शनिवार ता. २२–५–८३ रोजी वधूच्याच बालाजी मंदिराच्या जवळच्या निवासस्थानी ३ वा. १५ मिनिटाचे शुभ मुहूर्तावर साजरा करण्यात आला. वधूवरांचे अभिष्टचिंतन.

## पाटील–पाटील शुभविवाह

नवापूरचे श्रीसाईलीलेचे एक लेखक श्री. हसमुख ओंकार पाटील यांची कन्या चि. सौ. कां. शारदा हिचा विवाह श्री. चंद्रकांत पाटील यांचेबरोबर १–६–८३ रोजी सकाळी ९–४१ वा. नवापूर येथेच थाटात साजरा झाला. वधूवरांचे हार्दिक अभिनंदन.

## सकपाळ–धुळप शुभविवाह

दादरचे साईभक्त श्री. वासुदेवराव सकपाळ यांचे द्वितीय पुत्र श्री. निलम यांचा शुभविवाह वांद्र्यांचे श्री. नारायण धुळप यांची कन्या चि. सौ. कां. शालिनी हिजबरोबर ८–६–८३ रोजी दुपारी ४–३१ ला शारदाश्रम विद्या मंदिर हॉल भवानी शंकर मार्ग, दादर येथे थाटात साजरा झाला. वधूवरांना शुभाशिष देण्यासाठी विविध क्षेत्रातली नामवंत मंडळी हजर होती. वधूवरांचे मन:पूर्वक अभिनंदन.

## टिळक–चितळे शुभलग्न

डोंबीवलीच्या साईभक्त सौ. कुमुदिनी य. टिळक यांची कन्या चि. सौ. कां. शैलजा हिचा विवाह श्री. सतीश चितळे यांचेशी २७–५–८३ रोजी डोंबीवली येथील कल्याण रोडवरील मंगलकार्यालयात झाला.

## सांडभोर–गोडसे मंगलकार्य

पुण्याचे साईभक्त श्री. रघुनाथ सांडभोर यांचे पुत्र चि. सुनिल यांचा विवाह चि. सौ. कां. रत्नमाला गोडसे हिजबरोबर रतनधाम मंगल कार्यालय पुणे येथे २०–५–८३ रोजी दुपारी १ वाजताचे मुहूर्तावर थाटाने साजरा करण्यात आला.

## अन्नारेड्डी–बेलीडकर शुभविवाह

साईभक्त श्री. कृष्णराव अन्नारेड्डी यांचे सुपुत्र श्री. सुरेंद्र यांचा विवाह श्री. हनुमंत बेलीडकर यांची कन्या चि. सौ. कां. शोभा हिजबरोबर २२–५–८३ रोजी आर. के. इंडस्ट्रियल कंपाऊंड, मराठा सेक्शन ३२ स्टेशन रोड, उल्हासनगर येथे साजरा झाला.

# जय साई सद्गुरु

शिरडी हे गाव तुझे, साईबाबा नाव ।
भक्तजनांसाठी देवा, घेसी त्वरे धाव ।।धृ.।।

भेद नाही तुझ्या ठायी, असो रंक–राव ।
यवन हिंदू शिख ईसाई, साऱ्या समभाव ।।
'मालिक सबका एक', नसो दुजा भाव ।
भवजल पार लागो, माझी सुखे नाव ।।१।।

जय साई सद्गुरु, जय गुरुदेव ।
तारक 'सबुरी–श्रद्धा' मंत्र एकमेव ।।
मायबाप दयावंत, आमुचा तू देव ।
अनाथांच्या नाथा आम्हा, सदा सुखी ठेव ।।२।।

अल्पमती व्यथित मी, एक क्षुद्र जीव ।
कल्याणकारी प्रभू तू, साई सदाशिव ।।
उदी प्रसादाचा तुझ्या, असीम प्रभाव ।
तुझ्या पदी राहो माझा, नित्य भक्तिभाव ।।३।।

–श्री. नाथू रंगनाथ सोनटक्के
मु. पो. मढी बुद्रुक, (कोपरगाव)
जिल्हा – अहमदनगर.

# साई माझा साईनाथ

साई माझा साईनाथ । भोळा भगवंत
त्याचे दारी आला तोची जात नसे खाली हात
शक्ति त्याची मोठी किती, पाणी जाळी पणत्यात
महिमा त्याचा मोठा किती, गाजे तिन्ही भुवनात
साई माझा साईनाथ . . .

व्याधी घेई भगतांची, स्वतःचे शरीरात
रोगमुक्त करूनिया, सोडी त्यास जगतात
साई माझा साईनाथ . . .

मायबाप त्याचे, कोणासी ना ठाऊक
परी भगतांचा, तोची तो मायबाप
साई माझा साईनाथ . . .

शिर्डी मध्ये वसे जरी, लक्ष्य तरी भक्तांवरी
घार हिंडे आकाशात परि चित्त पिलावरी
साई माझा साईनाथ . . .

एकदाची जो गेला, शिर्डी साई दर्शनास
ऱ्हदयात साई त्यांचे, वसूनच सदा रहात
साई माझा साईनाथ . . .

शिर्डी मध्ये आला, तोची झाला धन्य
सकल पापे हरूनिया झाला पुण्यवंत
साई माझा साईनाथ . . .

गुण त्याचे वर्णू किती अज्ञानी बालक मी
अज्ञानाने लिहिलेले गोड करील माझा नाथ
साई माझा साईनाथ . . .

—श्री. श्याम आत्माराम तेंडोलकर
यशश्री अपार्टमेंट
राममारुती रोड,
नौपाडा, ठाणे.

# प्रणाम अमुच्या बाबांना

श्री साईनाथ दरबारी
श्रद्धा आणि सबुरी
दोन्ही फले बांधूनी पदरी
आम्ही जीवनपथ आक्रमितो ॥१॥

जो जगामध्ये मोठा
तो साई-दरबारी छोटा
होईल तयाचा तोटा
जो साईनाम ना स्मरतो ॥२॥

नित्य साईनाथा स्मरते
तयाचे स्वरूप आठविते
तयाचे चिंतन करीते
म्हणोनि माझे रक्षण करितो ॥३॥

म्हणूनी आम्हां सर्व भक्तांस
असतो बाबांचा नित्य ध्यास
आणि बाबांच्या दर्शनाची आस
म्हणोनि धावतात बाबा भक्तांकरिता ॥४॥

असा आशिर्वाद लाभो आम्हां सर्वांना ।
आमुचे लाखो प्रणाम आमुच्या पुज्य बाबांना ॥

–कु. शीला नाडकर्णी
बी–११ नटराज सोसायटी
रवि कंपाऊंड, नौपाडा, ठाणे–२

प्रतिकर्ण (पान १६ वरून)

यासिन तात्या कोते पाटील, बयाजी पाटील, महादेव फसले, कोंडाजी मुसलमान, जमलाबाई कोंडाजी, तमाशेवाले बत्तीस त्याना प्रत्येकी दररोज चार रुपये बाबा देत असत. जवळ जवळ ६०० ते ७०० रुपये ते दररोज दान करीत. अडल्या नडलेल्यांना मदत करणे हे तर बाबांचे प्रथम ध्येय होते.

स्वत: बाबा देखील बहुतेक भक्तांकडून दक्षिणा मागून घेत असत. कोणाजवळ किती पैसे आहेत हे बाबांना अंतर्ज्ञानाने बरोबर कळत असे. एकदा ब्रम्ह जाणून घेण्याच्या उद्देशाने आलेल्या एका धनिकाच्या खिशात नेमके किती रुपये आहेत हे त्यांनी बरोबर ओळखले. बाबांना फसविणे कोणालाही शक्य नव्हते. भक्त मंडळी लांब लांबून त्यांच्याकडे येत असत. जाताना त्यांच्या खिशात कधीकधी फक्त परत जाण्याइतपतच पैसे असत. बाबांची लहर फिरली की त्यातून देखील ते दक्षिणा मागून घेत पण नंतर मात्र दैवी चमत्काराच्या सहाय्याने ते त्याला घरापर्यंत सुखरूप सोडीत असत.

दक्षिणा घेण्याच्या या प्रकाराबद्दल त्यांच्या अेकनिष्ठ भक्ताने एकदा बाबांच्या जवळ पृच्छा केली. बाबांनी या बाबतीत ताबडतोब त्याचे स्पष्टीकरण केले. बाबा म्हणाले, " अरे बाबा मी वाटेल त्याच्याकडून दक्षिणा घेत नसतो व ज्याच्याकडून मी दक्षिणा घेतो त्याच्या दसपट रक्कम मी त्याला परत करतो. " बाबांचे हे म्हणणे म्हणजे खरोखरच वस्तुस्थीती होय हे त्यांच्या भक्तानीच कबूल केले आहे. म्हणूनच बाबांनी आपल्याकडून दक्षिणा घ्यावी असे प्रत्येक भक्ताला वाटत असे.

आपण नेहमी पहातो की काही लोक शनिवारी दान देतात तर इतर काही शिवरात्री, एकादशी अगर ठराविक वार अगर विशिष्ठ दिवस ठरवून दान देतात. बाबांचे तसे काही नव्हते. त्याना दान देण्यास सण सुद वा विशिष्ठ दिवस लागत नसे. याबद्दल जास्त खुलासा पुढीलप्रमाणे.

> हे काय सणासुदी दिसी ।
> कार्यविशेषी का पर्व काळासी ।
> प्रतिदिनी उक्त प्रमाणेसी ।
> संतोषेसी अर्पीत ।।

साईबाबांना दानाचे महत्व पूर्णपणे कळाले होते. सत्पात्री दान हेच पुण्य जोडण्याचे खरे साधन.

दानासारखे महत्पुण्य ! नाही नाही रे अन्यत्र या उक्तीवर बाबांचा दृढ विश्वास होता. वरील सर्व गोष्टींचा विचार केल्यास आपणास नक्की समजेल की बाबा हे त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमात दानाला किती महत्व देत असतील. ४४

# पुनर्जीवन

—नीला स. कीर्तने
२४–अे, महाराष्ट्र सोसायटी,
अॅलिस ब्रीज अेरिया,
अहमदाबाद—३८० ००६

माझ्या आयुष्यात प्रथमच "श्री साअीलीलेत" अनुभव लिहिण्याची बाबांनी संधि घडवून आणली. माझ्या ह्या पंचवीस वर्षांच्या लहान वयात माझ्यावर अनेक चांगले वाअीट प्रसंग आले व त्या सर्वांना मी धीराने तोंड देत आले. वेळोवेळी परमेश्वरी कृपेने मला शक्ति दिली, व अजूनहि देत आहे. परंतु साअीबाबांच्या कृपेचा साक्षात्कार व्हावा, तो माझ्या आयुष्यातील प्रसंग असा—

माझी मुलगी 'अदिती' गोवरातून नुकतीच उठली होती. आणि त्याच वेळेस माझ्या भावाची अेकुलती अेक नऊ महिन्याची मुलगी 'राजिता' गोवराने बेफाम आजारी पडली. दोन दिवस तापाने रडत होती. गोवराने नुसती फुलून निघाली होती. "तिला ताप आहे, सर्दी खोकल्याने बेजार झाली आहे, म्हणून लहान मूल रडणारच" अशा समजुतीने आम्ही तिला सांभाळत होतो, खेळवत होतो. त्यांत अिकडचा कडक उन्हाळा. त्यामुळे ती हैराण झाली होती. पुढे तिने अेकाअेकी औषध घेणे बंद केले. पाणी घेअीना, दूध घेअीना, थोडेसे पोटात गेले की, ओकून टाकी. रडणे तर सतत चालूच होते. संध्याकाळी आम्ही सर्वजण काळजीत पडलो. रात्रीचे साडे अकरा वाजले. डॉक्टरना विचारले. त्यांनी झोपेची गोळी दिली. तरी झोपेना, उलट जास्तच तिची प्रकृती बिघडत चालली. आणि रात्री एक वाजण्याच्या सुमारास डोळे फिरविण्यास लागली. छाती उडावयास लागली. एकंदरीत तिचे सर्व स्वरूप पहाता, तडक डॉक्टरकडे नेऊन तिला उत्कृष्ट लहान मुलांच्या दवाखान्यात दाखल केली. मध्यरात्री डॉक्टर धावून आले. त्यांनी तपासून त्वरीत उपचार चालू केले. तोंडावर ऑक्सिजन बॉक्स ठेवून सलाअीन आणि दुसरी औषधे चालू केली. परंतु चोवीस तासानंतर सुद्धा सुधारण्याचे चिन्ह दिसेना. अेवढी लहानशी, सुंदर, लाडकी मुलगी, असे तिचे हाल पाहिल्यानंतर कोणाचाच जीव थाऱ्यावर नव्हता. आम्ही अहोरात्र बसून होतो. पण म्हणतात ना — सर्व उपचार मानवाने केले तरी परमेश्वरी अिच्छेपुढे काही चालत नाही. मला बाबांची आठवण झाली. मनापासून प्रार्थना केली की, "बाबा माझ्या

मुलीला ह्यातून वाचवा. तिला बरे वाटू द्या. मी दर्शनाला घेऊन येईन.'' आणि मला बाबांच्या उदीची आठवण झाली, व ती उदी तीन दिवस मी तिला पाण्यातून 'हरिओम् साओ म्हणून पाजली, व अंगावर चोळली. आणि बाबांची उदी देताच खरोखर तिच्यात फरक पडला व रात्रीपासून ती टवटवीत दिसायला लागली. डॉक्टराने तिचेवर उपचार बंद केले. व ते म्हणाले, ती आता नॉर्मल आहे.तीन चार दिवस माझ्या देखरेखीखाली राहू द्या, मग तिला घरी घेवून जा. ते पुढे असेही म्हणाले, 'देवाने तुम्हाला सुबुद्धि दिली. व सकाळ उजाडायची तुम्ही वाट पाहिली नाहीत. नाहीतर मुलगी वाचली नसती मला बाबांनी प्रसंगाला बुद्धि दिली. धीर दिला आणि मृत्युच्या दाढेतून वाचवून तिला जीवदान दिले. नाहीतर भावाच्या, वहिनीच्या दुःखाला पारावार राहिला नसता. श्री साओदेवांनी आम्हांला अनेक प्रसंगातून वाचविले आहे. अजूनहि वाचवितात. श्री साओदेवाची आमच्यावर कृपा आहे. व ती तशीच कायम राहो अशी त्यांच्या चरणी प्रार्थना. अल्प सेवा जरी आपल्या हातून घडली तरी बाबा आपले जीवन धन्य करतात अशी त्यांची किमया आहे.

"धन्य श्री साओबाबा आणि त्यांची लीला!"

# श्रीसाईलीला

साईभक्ताकरीता महत्वाची सूचना

श्रीसाईलीलामध्ये श्रीसाईभक्तांनी काव्याच्या द्वारे आपापली हजेरी लावण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केलेला आहे. श्रीसाईगीते, कविता, अभंग, आरत्या इ. विपुल काव्य साहित्य अलिकडे आलेले आहे व आणखीन येतच आहे. इतके की त्या सर्वांची दखल घेणे व त्यांना लौकरात लौकर प्रसिद्धी देणे केवळ अशक्य होऊन बसले आहे. तरी साईभक्त कवींनी पुढील सूचना मिळेपर्यंत तरी काव्य श्रीसाईलीलाकडे पाठवू नये.

— संपादक

## ' जरी हे शरीर गेलो मी टाकून ।
## तरी मी धावेन भक्तांसाठी ॥

—सौ. सुशिला य. शिंदे
टिळकनगर १०८।३७७२,
चेंबूर, मुंबई–८९.

माझे आराध्यदैवतच श्रीसाईबाबा आहेत. आमच्या घरातील बऱ्या वाईट प्रसंगांचे मुख्य चालक बाबांच आहेत. जरी वाईट प्रसंग आला तरी त्यांना केव्हांच दोष न देता पुढील घडणाऱ्या चांगल्या गोष्टीची ही नांदीच आहे असे मी घरातील सर्वांना समजावून देते आणि त्यांनाही ते पटते. दररोज सकाळी उठते वेळी प्रथम बाबांचे दर्शन घेवून त्यांना नमस्कार करून पुढील कामाला सुरवात करणे तसेच झोपते वेळी पण बाबांना नमस्कार करून झोपणे हा आमच्या घरातील सर्वांचा नियमच आहे. तसेच घरातून बाहेर पडते वेळी आशिर्वादाच्या फोटोला हात जोडून आशिर्वाद घेवून निघतो. त्यांच्यावर संपूर्ण भार टाकून मी माझा संसार आजपर्यंत चालवित आहे. आणि चालवत राहाणार. माझी बाबांवर पूर्ण श्रद्धा आहे.

ह्या वर्षी दसरा श्रीसाईपुण्यतिथी दिवशी आलेला अनुभव, अनुभव नव्हे साक्षात्कारच मी इथे देत आहे. श्री साईबाबांचे शिरडी येथे होणारे रामनवमी, गुरुपौर्णिमा या उत्सवांना जाण्याचे भाग्य साईकृपेने मला बरेच वेळा लाभले आहे. रामनवमीचा कावडी स्नान सोहळा मी अनुभवला आहे. पण दसरा पुण्यतिथी उत्सवाला होणारा भिक्षा झोळी सोहळा पहावा अशी फार इच्छा आहे. पण मला काय तो योग अजून आलेला नाही. त्यामुळे फार दुःख होते. मन खीन्न होते. ह्या नवरात्रामध्ये बुधवारी श्री साईसच्चरिताचे पारायण सप्ताह मी सुरू केले आहे. त्याची समाप्ती दसऱ्याच्या दिवशी करून श्रीसाईची पुजा बांधली. तरीही माझे मन प्रसन्न नव्हतेच. संपूर्ण दिवस दसऱ्यासारखा दिवस असूनही मन बेचैन होते. त्याच अवस्थेत रात्री झोपतेवेळी बाबांच्या पुजेसमोर बसून हात जोडून म्हणाले बाबासाई मी करंटी आहे, पापी आहे. मला दसऱ्याच्या दिवशी तुमचे दर्शन केव्हाच शिरडीत होणार नाही कां? असे बोलून अनन्यभावे नमस्कार करून समोरच झोपले. त्याच रात्री स्वप्नात साधारण अर्धवट जागृत अवस्थेत असतानांच श्री साईबाबा दोन माणसाच्या खांद्यावर हात टाकून हळूहळू समोरून येत आहेत असे मला दिसले. बाबा माझ्याजवळ आले.माझ्या बाजूला आमच्या

ओळखीचे एक बाल ब्रम्हचारी श्री. वर्तक नावाचे गृहस्थ उभे आहेत. ते म्हणाले, बाबा आले, त्यांच्या पाया पड. मी त्यांना म्हणाले मला भिती वाटते. बाबा मला मारतील. असे म्हणून मी साईच्या चरणावर मस्तक ठेवले. बाबांनी दोन्ही हातांनी धरून मला वर उठवित म्हणाले बेटा ५। रुपये दान दे. एवढ्यात मला जाग आली. मी उठून बसले. समोरच पुजेमध्ये लावलेला बाबांच्या समाधि फोटोतील साईबाबा माझ्याकडे पाहून हसत आहेत असे दिसले. माझे डोळे आनंदाश्रूनी भरून आले. काय सांगू खरोखर भीक्षा झोळी सोहळा प्रत्यक्ष शिरडीचा मला असा अनभवू दिला. धन्य माझ्या बाबांची. मी बाबांना हात जोडून म्हणाले बाबा मला क्षमा करा. जगत्चालक श्रीसाईची मुलगी कधी दरिद्री नाही. हा दसरा माझ्या जीवनातील अविस्मरणीय राहिल. दुसऱ्या दिवशी गुरुवार होता. मी माझ्या मोठ्या मुलाला दादर येथील साईनिकेतन संस्थान ऑफिसमध्यें पाठवून त्याला बाबांच्या आदेशानुसार सव्वा पांच रु. दान व ६ रु. पोथी वाचनाची दक्षणा मिळून ११। रु. शिरडीला पाठविण्यास सांगितले.

एकाग्र नेत्र तू लाव तुझे मज कडे ।
मी कृपाकटाक्षे पाहिन रे तुज कडे ॥

या बाबांच्या वचनांची प्रचिती आली. श्रद्धा आणि सबुरी असल्यावर बाबा आपल्यापासून केव्हांही दूर नाहीत. बाबा असाच कृपाकटाक्ष सदैव तुमच्या सर्व लेकरां-वर ठेवा हीच साईचरणी प्रार्थना. अशा माझ्या अनंतकोटी ब्रम्हांड नायक साईबाबांना शतश: प्रणाम ।

'जरी हे शरीर गेलो मी टाकून ।
तरी मी धावेन भक्तांसाठीं ॥

### श्रीमूर्तीला घातलेला हार वाढला

नवापूरचे साईभक्त श्री. रमेश डी. चव्हाण यांचे निवासस्थानी श्री बाबांच्या मूर्तीला घातलेला हार ८० इंचानी वाढल्याचे दिसून आले आणि हा चमत्कार पहाण्या-साठी भक्तांनी तोबा गर्दी केली असे श्री. चव्हाण यांनी कळविले आहे.

# साईभक्त र. शं. जुन्नरकर यांचे निधन

आमचे स्नेही, श्रीसाईलीलाचे एक निष्ठावान लेखक व कवी श्री. रघुनाथ शंकर जुन्नरकर यांचे १४ मे ८३ रोजी बोरीवली येथील त्यांच्या रहात्या निवासस्थानी निधन झाल्याचे शोकवृत्त दूरदर्शनवर ऐकले आणि मनाला अतिशय वाईट वाटले. श्री. जुन्नरकरजी गेले कित्येक महिने आजारीच होते. ते गोळ्यां-वरच जगत होते असेच म्हणावयास हवे. सोमवार ता. ७ फेब्रुवारी ८३ रोजी सकाळी ११–३० वाजता ते मला भेटण्यासाठी म्हणून माझ्या गिरगावातील कचेरीत आले होते. जिने चढायला नकोत म्हणून खालीच माझी वाट पहात अस्वस्थ मनाने ते उभे होते. येताना त्यांनी "प्रकटे मस्जिदमें साईभगवान" या नुकत्याच हिंदीत प्रकाशित झालेल्या कादंबरीची भेटप्रत त्यांनी आणली होती ती हातात घेत मी त्यांचे त्रिवार अभिनंदन करून त्यांना उत्तरोत्तर सुयश चिंतीले 'परंतु हे माझे शेवटले कार्य' असे काहीतरी पुटपुटले तेवढेच मी ऐकले आणि घाई गडबडीत मी त्यांना निरोप दिला तो शेवटचाच ठरला.

श्री. रघुनाथराव जुन्नरकर हे मा. विनायकांच्या जमान्यातील एक निष्णात चित्रपट संकलनकार, पटकथाकार, आणि श्रेष्ठ दिग्दर्शक म्हणून नावारूपाला आले होते. मा. विनायक, बाबूराव पेंढारकर, आचार्य अत्रे यासारख्या चित्रपट श्रेष्ठींचे सान्निध्य त्यांना लाभले होते. पहिली मंगळागौर, भक्त पुंडलिक, संत बहिणाबाई, तुझाच अशी कितीतरी त्यांची गाजलेली चित्रे आहेत. सेटवर त्यांचे कलात्मक दिग्दर्शन अगदी पहाण्याजोगे असायचे.

श्री. जुन्नरकरजी परम साईभक्त होते. त्यांची माझी त्यांच्या कुटुंबा समवेत पहिली भेट शिरडीतच गुरुस्थानी झाली, तेव्हांपासून त्यांचेबद्दल एक प्रकारचा अत्यादर मला वाटत असे. यांनी 'मशिदीत प्रगटला परमेश्वर' या आपल्या साई कादंबरीचा संकल्प सोडला तो माझ्याच निवासस्थानी श्री बाबांच्या समोर व तो पूर्ण झाला हे मला तेव्हां कळले. याच कादंबरीचे 'मिशन डिव्हाईन' हे इंग्रजी रुपांतर श्री साईबाबांच्यावरील पहिली इंग्रजी कादंबरी लिहून त्यांनी मोठी क्रांतीच केली. याच कादंबरीचा हिंदी अनुवाद बैतुलचे प्रा. आद्याप्रसाद त्रिपाठी यांनी 'प्रगटे मस्जिदमें साईभगवान' असा करून पुस्तक रुपाने ती कादं-बरीही प्रकाशित झाली आहे. तीन भाषेत बाबांच्यावरील कादंबरी प्रकाशित करून त्यांनी श्री बाबांची फार मोठी सेवा केली आहे. ते बाबांचे जसे परमभक्त होते तसेच साकोरीसही ते नित्य जात. व श्री उपासनी महाराजांची पण सेवा करीत. प. पू. गोदावरी माताजींचाही शुभाशिर्वाद त्यांना लाभला होता. 'साकोरी दर्शन' हे सचित्र इंग्रजी पुस्तक त्यांनीच लिहिले आहे. निधन समयी त्यांचे वय ७२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी, सुशिक्षित पुत्र व कन्यका आहेत. श्रीसाई मृतांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती देवोत.

श्रीसाईबाबा संस्थान शिरडी व श्रीसाईलीला मासिक त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहेत.

**—का. संपादक**

# गुरु पौर्णिमेच्या निमित्ताने

आज गुरुपौर्णिमा! आज गुरुपौर्णिमा!!
जीवनांत ही माझ्या, आज शरदपौर्णिमा ॥ धृ ॥

शरदातील गमते शीतल, धवल चांदणे
पुलकित मन आज हो, आज गुरु स्मरणे
कृपेचे तयांच्या स्वच्छ शुद्ध चांदणे
शुभदिनीं या शुभ कार्य, आज गुरु वंदणे ॥ १ ॥

बाळ मी तान्हुला आहे तुझाच सानुला
तुजविणे मज दुजा कोणे सांग तो विरंगुळा
गुरु माझी माऊली, गुरु कृपेची साऊली
आस मनीं हीच एक, ठेव कृपा सावली ॥ २ ॥

बाळ मी अजाण-अज्ञ, मज ठाऊक कांही नसे
भवसागरीं तरु कसा, तीर ना मजसी दिसे
अंधारा मार्ग असे, पुढती ना कांही दिसे
गुरु माझा नित्य तिथे, मार्ग मला दावितसे ॥ ३ ॥

भवसागर हा अथांग, कुठें तया अंत नसे
पार या करुं कसा, हीच मना खंत असे
दाविल मज कोण मार्ग, संभ्रम मम मनीं वसे
तोच कठीण समयासि, मजसि मम गुरु दिसे ॥ ४ ॥

नौका ही दिशाहीन, मार्ग तिला नच दिसे
संसारीं कधी न तिला, कधी न तिला मार्ग दिसे
वादळ—वाऱ्याशी झुंज, संकटावरि मात नसे
" दीपस्तंभ " होऊनिया, गुरुचि मज साथ असे ॥ ५ ॥

षड्रिपुंशी संग्राम सदा, नित्य पहा चालतसे
माझ्या मीच भ्रमित मना, सदैव पहा पुसतसे
काय करुं, काय नको, प्रश्न मला नित्य असे
खडतर संघर्षी या, गुरु माझा "सेनानी" असे ॥ ६ ॥

हीच गुरुचि महति, हीच गुरुचि प्रचिती
दर्शनाने तयांच्या, घडो जीवनीं प्रगती
नको मला जन्म पुन्हा, नको पुन्हा तेच जिणे
तव चरणीं ठेवी मज, हेंच एक विनवणे ॥ ७ ॥

सद्गुरु मज लाभला, हेच मम भाग्य असे
'गुरुकृपा' मज लाभली, दुजे मागणे काहीं नसे
सतत तुझें स्मरण असो, नित्य तुझें चिंतन
गाणे तव महती सदा, हेच तुजसि वंदन ॥ ८ ॥

मोद मनीं अति झाला, गाता तव गुणगान
विसरुनी मी तर गेलो, सकल मम चित्तभान
गोड करावी ही सेवा, करीतो आपुला सन्मान
'माधव' तव लेकरु, आहे बघ किती अजाण ॥ ९ ॥

आज गुरुपौर्णिमा, आज गुरुपौर्णिमा !
जीवनातील ही माझ्या आज शरदपौर्णिमा

—श्री. माधव गंगाधर भागवत
२१ । २१३, 'धवलगिरी'
पोलीस स्टेशन समोर,
वर्तकनगर, ठाणे—४०० ६०६.

## श्री. देवेंद्र परब यांचे निधन

आमचे स्नेही व मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे सध्याचे डीनसाहेब श्री. वसंतराव परब यांचे चिरंजीव श्री. देवेंद्र यांचे कऱ्हाडजवळ मोटार अपघातात सापडून दुःखद निधन झाले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांचे चिरंजीव श्री. राजु यांचे बरोबर ते होते व जिप ते स्वतः चालवित होते. राजु व देवेंद्र जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये तिसऱ्या वर्षाच्या अभ्यासक्रम पुरा करीत होते. निधन समयी श्री. देवेंद्र यांचे वय अवघे २५ वर्षांचे होते. त्यांचे वडील श्री. वसंतराव नुकतेच औरंगाबादहून मुंबईस आले होते.

श्रीसाई मृतांचे आत्म्यास चिरशांती व सदगती देवो.

# गुरु पौर्णिमा

आज पातली गुरुपौर्णिमा
धांवे शिरडी भक्त जीवात्मा
म्हणे पाहूनी श्री परमात्मा
सद्‌गुरु साइ चरणी नमा ।।१।।

भक्तजनांची शिरडी दाटी
आशिस् द्याया श्री जगजेठी
पहा प्रगटला साईधामा
सद्‌गुरु साई चरणी नमा ।।२।।

इशि वाशित्व अणिमा गरिमा
प्राप्त नप्राकाम्या महिमा लधिमा
सांगली सर्वां जणु भूतात्मा
सद्‌गुरु साई चरणी नमा ।।३।।

भक्तांचे कर दोन्ही जुळले
नतमस्तक ते पदी जाहले
गर्जत साई कल्पद्रुमा
सद्‌गुरु साइ चरणी नमा ।।४।।

साईमंदिर खुले निशीदिनी
भक्त जाहले खूष मन्मनी
सारे जपती मंगल नामा
सद्‌गुरु साई चरणी नमा ।।५।।

साइनाथ ही गुरु माऊली
प्रसन्न भक्ता पहा जाहली
अपराधांची करील क्षमा
सद्‌गुरु साई चरणी नमा ।।६।।

रथयात्रा ही श्री बाबांची
मिरवणूक ती पूज्य पोथीची
आज काढण्या भक्तजमा
सद्‌गुरु साइ चरणी नमा ।।७।।

गुरुकृपेची पडतां दृष्टि
भक्तांवरती तेजः वृष्टि
भरूनी जातो प्रेमे आत्मा
सद्‌गुरु साई चरणी नमा ।।८।।

भक्तजनांची शिरडी वारी
गुरुपौर्णिमा भव्य साजरी
गीत गातसे नभी चंद्रमा
सद्‌गुरु साई चरणी नमा ।।९।।

नमो नमः श्री गुरुब्रम्हा
किती वर्णावा साइमहिमा
श्रद्धा सबुरी ठेऊनी प्रेमा
सद्‌गुरु साइ चरणी नमा ।।१०।।

—श्री दा. र. दळवी.
५।७८, बी. पी. टी. कॉलनी
रेनॉल्ड रोड, वडाळा, मुंबई ३७

## साई नाव तुझे क्षितिजा पलिकडे

इकडे तिकडे चहुंकडे
नांव तुझे क्षितिजा पलीकडे ।।धृ।।
जो आला तुझ्या शरणी
तो गेला झोळी भरूनी
वाहसी तु त्याला सांकडे ।।१।।
ज्याने पुजिले भक्ति भावे
तैसा तैसा तु हि त्यांसी पावे
जाई तोचि प्रकाशाकडे ।।२।।
विश्रांती साई नांवात खरी
धरा मनी श्रद्धा सबूरी
संजया संगे मिळूनी जाऊं शिर्डीकडे ।।३।।

—श्री स्वामी संजयानंद बद्रीधाम हिमालय.

## ।। साई असे कैवारी ।।

शिरडीची करिती जे वारी
तयांचा साई असे कैवारी
१) शुद्ध भक्ति ज्यांच्या ठायी
बंधुभाव नांदे हृदयि
देती जे भुकेल्यास भाकरी
तयांचा साई असे कैवारी
२) साई चरणी प्रीती ज्यांची
ओढ मनी सत्कार्याची
जयांच्या स्वार्थ नसे अंतरी
तयांचा साई असे कैवारी
शिरडीची करिती जे वारी
तयांचा साई असे कैवारी

—जयवंत कुळकर्णी
कुलकर्णी कुटीर, १०, प्रार्थना समाज रोड,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७.

# साई चरणी सारे लागा रे !

कोण कुणाचे सगे सोयरे
गाऊ भजन साईचे
आपण सारे साई भजन गाऊ रे ।।धृ.।।

दुनियाशी मतलब काय तुझा रे
कुणी जगी तुला नाही रे
तारी तुला वेड्या, साईबाबा रे
अन्य न तारी तुला कोणी रे ।।१।।

नशा मदिरा हवी कशाला
नशेल जगशी का रे
साई नामाची नशा चढू दे रे
अन्य नको तुला काही रे ।।२।।

जीवन अपुले घडी दो घडीचे
आधार एक साईबाबा रे
आसावरीची आस ही मोठी
साई चरणी लागा रे ।।३।।

—लावणीसम्राज्ञी सौ. आसावरी वायकूळ
संगीतविशारद, इ–९–८, बर्वेनगर
घाटकोपर (पश्चिम), मुंबई – ४०० ०८४

## श्रीसाईलीला

० मजकूराच्या गर्दीमुळे या अंकापासून सुरू होणाऱ्या दोन लेखमाला – (१) श्रीसाईबाबा संस्थान शिरडी परिचयमाला (२) प. पू. श्री नरसिंहस्वामीजी व्यक्ति आणि कार्य – लौकरच श्रीसाईलीला मधून सुरू करण्यात येतील.

का. सं.

## करुणानिधी राजा, असा हा साई माझा

अंगापुरते कफन तनूवर
शुभ्र वस्त्र बांधून शिरावर
लाजवितो रवि तेजा
असा हा साई माझा ॥१॥
धन कनकाची नाही आशा
पोटापुरती घेई भिक्षा
वाली पतित जनांचा
असा हा साई माझा ॥२॥
आस कशाची नाहीं त्याला
जन-सेवेचा ध्यास लागला
हाच कृपावर साजा
असा हा साई माझा ॥३॥

—श्री. शांताराम नांदगावकर
"प्रशांत" १९ व २० वा रस्ता,
खार (पश्चिम), मुंबई – ४०० ०५२.

## साईमय जीवन व्हावे

काय कमी मला आहे
स्वयं साईबाबा दृष्टी पाहे ॥
साऱ्या जगताचे सुख ।
मिळे अवलोकिता साई मुख ॥
जरी दैवाधीन आहे सारे ।
साई नामे दैवहि फिरे ॥
सत्ता संपत्ति नको काही ।
नको संतती नाव लौकिकही ॥
तुच्छ वाटे सारे जग ।
मनी एकच तगमग ॥
सारे सारे विसरुनी जावे ।
साईमय जीवन व्हावे ॥

—डॉ. इंदु नाईक. सीताकुंज, लोणावळा.

# धन्य आम्ही साईदास

शिरडीचा वास
धन्य आम्ही साईदास
मुखी नाम घेता
लाभे प्रसादाचा घास . . .

साई गुणग्राही
साईमनी किंतु नाहीं
क्षीण सर्व जाई
मायेने गा नित्य पाही . . .

अखंडित भेट
भक्ताला ना वाटे वेठ
रम्य सुखधाम
कैवल्याचा हाच शेठ . . .

पोटाची या चिंता
कोण करी येथे येता
ब्रम्हानंदामाजी
आयुष्य भोगी मुक्तता . . .

—श्री. दत्ता कदम, एम. ए.
५७८ चव्हाण अपार्टमेंटस्
जंगली महाराज रस्ता,
डेक्कन जिमखाना, पुणे ४

# प्रार्थना

प्रार्थना साई तुलाही तू सदा जवळी रहा
मी जेथे जाईन तेथे प्रेम दृष्टीने पहा ।।१।।

दुःख जेव्हां दाटूनिया भार होतो अंतरी
मी कसे विनवु तुला रे धाव तू गरुडा परी
संकटाशी झुंजण्याला हात दे मजला दहा ।।२।।

स्वैर वेगे जीवनाच्या धांवतो रथ सारखा
संयमाचा पथही माझ्या लोचनाना पारखा
सारथी होऊनी आता आवरी अपघात हा ।।३।।

आस नाही मज कशाची खंत नाही मानसी
तू नभाच्या लोचनानी सर्व काही जाणसी
देह हा कर्मात सरूनी सफल होवो जन्म हा ।।४।।

—डॉ. सौ. सुमती खानविल्कर
सीताकुंज, लोणावळा

## साईभक्त वसंतराव पडते यांचे निधन

कुडाळचे साईभक्त आणि सामाजिक कार्यकर्ते श्री. वसंतराव पडते यांचे मुलुंड येथे त्यांच्या जामातांच्या घरी बुधवार ता. ७ जून १९८३ रोजी रात्री १—३० वाजता दुःखद निधन झाले. ते कुडाळहून येथे नुकतेच आले होते. कुडाळ येथील कॉंग्रेस समिती (सा.) चे ते अध्यक्ष होते. रत्नागिरी व कोकणपट्टीतील एक सेवा—तत्पर कार्यकर्ता म्हणून त्यांचा लौकिक होता. कोकणातील अनेक शिक्षण संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. चेंदवण येथील श्रीदेवी माऊली विद्यालयाची आजची प्रगती हे त्यांच्याच कष्टाचे व सेवेचे फळ होय. त्यांच्या अचानक निधनाने असंख्य कुडाळकरांना हळहळ वाटली. श्रीसाईलीला ९ व्या लेखक—कवी संमेलनास ते हजर होते व मासिकाच्या प्रगतीच्या दृष्टीने त्यांनी एक छोटेसे भाषणही केले होते.

त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी, कन्यका, मुले, नातवंडे व असंख्य मित्र-परिवार आहे. त्या सर्वांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

श्रीसाई मृताच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो.

# गुरुपौर्णिमा उत्सव

आज गुरुपौर्णिमेचा शुभदिन उगवला
चालला थाटात बाबांचा सोहळा
असते पौर्णिमेला मशिदीत साईंची पूजा
इच्छेने ठेवली जाते तिथे गुरुदक्षिणा ॥१॥

निघते श्रींची मिरवणूक सजवलेल्या रथातून
करतात सुवासिनी बाबांना औक्षण
साईनामाने करावा आरंभ शुभकामास
गुरुपौर्णिमेविना नसे त्यांना शुभदिन ॥२॥

अखंड चालतात किर्तन, प्रवचन मंदिरात
आनंदाने भक्तगण त्यात रमतात
काल्याच्या दिनी मध्यान्हीला हंडी फोडतात
मग प्रसादाची मौज सर्व लुटतात ॥३॥

—सौ. वसुंधरा रामराव चोरे
८०३, सी, डॉ. आंबेडकर रोड,
दादर, मुंबई – ४०० ०१४

★

# शिरडी वृत्त माहे मे १९८३

या महिन्यात शिरडीस श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी शेवटच्या आठवड्यात बाहेरगावची भक्तमंडळी फार मोठ्या बहुसंख्येनें आली होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणें –

**कीर्तन** – (१) ह. भ. प. मुरलीधर रामराव देशमुख, शिरडी
(२) नानासाहेब रासने, शिरडी.

**प्रवचन** – (१) ह. भ. प. नानासाहेब दा. रासने, शिरडी
(२) ह. भ. प. लक्ष्मण महाराज वाकचौरे शिरडी

**भजन, गायन, वादन, नृत्य वगैरे** – (१) श्री. रमेशचंद्र भिकूलालजी श्रीमाली, जालना (२) श्री. शिवाजी धुमाळ, शिरडी, (३) श्री. नारायण स्वामी, जबलपूर, (४) सौ. आसावरी वायकूळ, घाटकोपर, (५) श्री साईनाथ भजनी मंडळ, शिरडी, (६) कु. अँडल ,अपर्णा (गुरु) राममूर्ती हैद्राबाद, नृत्य (७) श्री. राममूर्ती, हैद्राबाद, (८) सौ. गुणवंती पांडू, हैद्राबाद, (९) श्री. एम्. एन्. पांडू, हैद्राबाद, (१०) श्री रामदास अनंत पाटील, (११) श्री. रमेश दत्तात्रय धनवडे, रत्नागिरी, (१२) सौ. मीना चित्रकुमार रेळे, मुंबई, (१३) कुशल चित्रकुमार रेळे, (१४) श्री. नारायण रामचंद्र मरागजे, (१५) सौ. अनुसयाबाई नारायण मरागजे, सातारा, (१६) श्री. श्याम गोगटे, (१७) श्री. गिरीश गोगटे, (१८) कु. संगीता श्याम गोगटे, मुंबई, (१९) श्री. सुभाष मुकुंद मुनशी, अंधेरी, (२०) श्री. तुषार द्वारकानाथ भोसले, बडोदा, २१() श्री. चैतन्य यादव, इंदौर, (२२) कु. अनुप्रिया देवताळे, इंदौर, (२३) श्री. टी श्यामचरण नंदीऑल (२४) श्री. अशोक भीमसेन जाधव, (२५) सौ. आरती अशोक जाधव, वसई, (२६) श्रीमान ईश्वरदास रामदास मास्टर (२७) श्रीमती वेदावती बहेन एम. गोपाल, हैद्राबाद, (२८) श्री. ठाकरे शांताराम कृष्णा, भुसावळ, २९) श्री. हिरालाल बेला, खरगपूर, (३०) श्री. ह. भ. प. लक्ष्मण आनंदा मिरजकर, ईस्लामपूर.

**हवापाणी** – शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाहीं. पहाटे हवा अल्हादकारक असते.

# साईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | १२=०० | ६=०० |
| २) | ,, | इंग्रजी | १३=५० | ४=०० |
| ३) | ,, | हिंदी | १२=०० | ४=०० |
| ४) | ,, | गुजराथी | १२=०० | ४=०० |
| ५) | ,, | कन्नड | १०=०० | ४=०० |
| ६) | ,, | तेलगू | १३=०० | ४=०० |
| ७) | ,, | तामीळ | १२=०० | ४=६० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७=५० | ३=०० |
| ९) | ,, | हिंदी | ७=०० | ३=५० |
| १०) | ,, | गुजराथी | ४=२५ | ३=०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४=०० | ३=०० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०=३५ | ३=०० |
| १३) | ,, | गुजराथी | ०=३० | ३=०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०=५० | ३=०० |
| १५) | ,, | गुजराथी | ०=५० | ३=०० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १=२५ | ३=०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (मध्यचा) | इंग्रजी | ५=०० | ३=०० |
| १९) | किर्तनमाला | मराठी | ०=७५ | ३=०० |
| २०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४=०० | ३=०० |
| २१) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४=५० | ३=०० |
| २२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १=७५ | ३=०० |
| २३) | ,, | इंग्रजी | १=७५ | ३=०० |
| २४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | ,, | गुजराथी | १=५० | ३=०० |
| २६) | ,, | हिंदी | १=७५ | ३=०० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

( कव्हर पृष्ठ ३ वरून )

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७) | ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०=५० | ३=०० |
| १८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५=२५ | ३=०० |
| १९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १=५० | ३=०० |
| २०) | ,, | मराठी | १=५० | ३=०० |
| २१) | शिरडी गाईड | गुजराथी | १=५० | ३=०० |
| २२) | ,, | हिंदी | छपाई चालू | आहे. |
| २३) | रुद्राध्याय | मराठी | ०=९० | ३=०० |

२४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षिक वर्गणी
१०=०० प्रत्येकी प्रत १=००
( व्ही. पी. ची पद्धत नाही )

| अ.क्र. | फोटोचे नाव | फोटो साइज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०' | १=६५ | ३=०० |
| २) | ,, | १०"×१४ | १=१० | ३=०० |
| ३) | ,, | ७"×१०' | ०=५५ | ३=०० |
| ४) | ,, | ४"×५" | ०=२० | ३=०० |
| ५) | ,, | २"×३" | ०=१५ | ३=०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा ( रंगीत ) | १४"×२०" | १=६५ | ३=०० |
| ७) | ,, ( काळा पांढरा) | १४"×२०" | १=६५ | ३=०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २=७५ | ३=०० |
| ९) | ,, | १३"×१८" | १=०० | ३=०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा ( रंगीत फोटो ) | १०"×२० | १=१० | ३=०० |
| ११) | ,, ( काळा पांढरा) | १०'×१४" | ०=८५ | ३=०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो ,, | ९'×१२' | १=१० | ३=०० |
| १३) | ,, ( रंगीत ) | ९"×१२' | १=६५ | ३=०० |
| १४) | निळा | ९×१३ | ०=७५ | ३=०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पध्याचे कॅलेंडर | — — — | १६=०० | ८=०० |

मुद्रक : पांडुरंग मोरे बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि., ४२, बी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, संपादक व प्रकाशक : श्री. क. हि. काकडे, साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लाट नं. ८०४ बी. दादर, मुंबई १४